१९६६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २०७९.

# प्राचीन मराठी कविता

## खंड ४ था

संपादक
ज. शा. देशपांडे
कृष्णदास महानुभाव

REFBK-0015579
REFBK-0015579
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

माननीय महंतश्री
कै. बाळकृष्ण शास्त्री यांच्या
पुण्यस्मृतीस

२२।३।७१

राठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने पुरस्कार दिलेले

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन

# प्राचीन मराठी कविता

## खंड ४ था

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५६९ वि. काव्य
२०७९ २२।३।७९

हयग्रीवाचार्यकृत

गद्यराज

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५५७९

संपादक

ज. शा. देशपांडे
कृष्णदास महानुभाव

REFBK-0015579
REFBK-0015579

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

प्रकाशक :

वासुदेव विष्णु भट
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
दादर, मुंबई १४.

आवृत्ति १ ली : १९६६

किंमत दोन रुपये

मुद्रक :

कृ. भि. राऊळ
व्यवस्थापक,
को. ए. सो. प्रिंटींग वर्क्स, अलिबाग.

# दोन शब्द

श्रीचक्रधर निरुपित ब्रह्मविद्याशास्त्राचे अध्ययन प्रारंभ करण्यापूर्वी विद्यार्थ्यांना गद्यराजादि स्तोत्रें शिकविण्याची प्रथा महानुभावपंथात प्राचीन काळापासून चालत आलेली असल्यामुळे या काव्याची व माझी तोंड ओळख बरीच जुनी असली तरी अर्थ समजू लागल्यापासूनच मला त्याची खरी आवड उत्पन्न झाली व हे काव्य संपादित करून प्रकाशित करण्याच्या दृष्टीने पोथ्या मिळवून मी अभ्यास करण्यास प्रारंभ केला. पण ललितसाहित्याच्या या शताब्धींत अशा साहित्याची विक्री जेमतेमच असल्यामुळे व प्रकाशनार्थ आर्थिक व्यवस्थेचा प्रश्न देखील मजपुढे असल्यामुळे, मी हा नाद जवळ जवळ सोडण्याच्याच विचारात असतांना, श्री. ज. शा. देशपांडे यांची भेट झाली व त्यांनी संपादन कार्यात सहकार्य करण्याची सूचना केल्यावरून हे कार्य पुनः हाती घेतले. अल्पावधींत या काव्याचे विस्तृत विवेचन आणि सांगोपांग संपादन होणे शक्य नव्हते, तरी वाचकांचा मूळ काव्याशी परिचय होऊन त्यातील काव्यरसाचा व तत्त्वज्ञानामृताचा आस्वाद त्यांना घेता यावा म्हणून हा प्रयत्न आम्हो केला आहे. प्राचीन टीकाकारांची परस्पर एकवाक्यता नसल्यामुळे, अर्थनिर्णायक टीपा व श्लोकांचे अर्थ देतांना योग्य वाटतील ते संक्षेपार्थ दिले आहेत. तेव्हां क्वचित अर्थबोध न झाल्यास वाचकांनी प्राचीन टीकाकारांचे सहाय्य घ्यावे.

येथे या गोष्टीचा देखील निर्देश करणे आवश्यक आहे कि, पंथीयेतर अनेक विद्वान व त्यांच्या विविध संस्था महाराष्ट्रात सर्वत्र महानुभावीय वाङ्मयाचे अध्ययन, अध्यापन, संपादन व प्रकाशन अत्यंत परिश्रमपूर्वक करीत आहेत. कृतज्ञतापूर्वक त्यांच्या कार्यात सर्वप्रकारे सहाय्य करणे हे आम्हा पंथीयांचे आद्यकर्तव्य आहे, पण दुर्दैवाने हे कर्तव्य पार पाडण्यांत औदासिन्य व क्वचित विरोधाचाच अनुभव येतो. यापुढे सुविद्य महानुभाव काळाची पावलें ओळखून सर्वांशी सहकार्याच्या भावनेने वागतील तरच या संघटनेच्या युगांत त्यांना प्रगति करता येईल.

प्रकृति अस्वस्थ असतांना देखील श्री. ज. शा. देशपांडे यांनी संपादनकार्यात घेतलेले परिश्रम आणि त्यांचेकडून मला लाभलेले प्रोत्साहन; महंत श्री. गोविंदराज बुवा, महंत श्री. गोपिराज बुवा व महंत श्री. वायदेशकर बुवा यांनी पोथ्या देऊन केलेले सहाय्य आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे चालक मंडळाचे मान्यतेमुळें मला गद्यराजाच्या संपादनकार्यात सहभागी होता आले याबद्दल मी या सर्वांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

हैदराबाद
दि. २४–१२–६५

—कृष्णदास महानुभाव

# प्रस्तावना

' नवें नवनीत ' तयार करीत असताना हयग्रीवाचार्यांच्या गद्यराजाकडे माझें लक्ष गेलें व त्याच्या एका हस्तलिखिताची प्रत नकलून ठेवली. हें काव्य छापावें असें मनांत होतें, परंतु योग्य प्रती मिळवण्यांत बराच काळ गेला व आतां हें काव्य ' प्राचीन मराठी कविता खंड ४ था ' म्हणून वाचकांसमोर ठेवीत आहे.

प्रस्तुत काव्य इ. स. १९०८ मध्यें कै. बाळकृष्ण दादा कानडे यांनी सोलापूर येथें सच्चिदानंद छापखान्यांत छापून पंथामध्यें प्रसार करण्यासाठीं प्रसिद्ध केलें. त्यावेळीं हें काव्य महानुभावीय पंथाबाहेर गेलें नाही. त्यामुळें छापील प्रत अत्यंत दुर्मीळ आहे. त्या प्रतींत शब्द तोडलेले नाहीत हा मोठा दोष आहे. महाराष्ट्र सारस्वत, महानुभावीय मराठी वाङ्मय, मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग २, यांत या काव्याबद्दल उल्लेख आढळतील. कै. ह. ना. नेने यांनी हयग्रीवाचार्यकृत गद्यराज स्तोत्र हा लेख (भारत इतिहास–संशोधक मंडळ त्रैमासिक जानेवारी १९३८ ) लिहून या काव्याकडे वाचकांचें लक्ष वेधलें.

या काव्याचे जुन्या ग्रंथातले उल्लेख खालीलप्रमाणें आहेत —

## (१) स्मृतिस्थळ व वृद्धाचार :-

स्मृतिस्थळ –(११३)– " भटोबासां मागा केतुलेया एका काळा आनोबासाचा हरगर्वी भिक्षा केलेया हे अवघे आइकौनि म्हणितलें : सकळ कविपरिस हा चतुर : मग आपणही श्लोकबंध गद्य केलें. "

वृद्धाचार (१६)– यांत हयग्रीवाचार्य राक्षसभुवनचे विद्वान असल्याचें सांगितलें आहे. त्यांची व कवीश्वरांची भेट झाली. आनोबासांचीहि भेट झाली. " मग येहीं प्रतिष्ठानि राहुनी भोगनारायेणि गद्यें केली : तेथचि प्रतिष्ठानिं देहावसान जालें आठ वरिसे येमि मार्गरूढी ।। १६ ।।

## (२) केसोबा चाउरगांवकराचे अन्वयस्थळ --

" येचि वर्तमानीं अणोबाबासाचें सीख्य हीरण्यगर्भनामी पैठणीं भोग नारायणीं गद्यें केली " (महानुभावी सारस्वत, अन्वयस्थळ, भा. इ. सं. मंडळ स्वीयग्रंथमाला क्रमांक ४४, १९३६ सं– ह. ना. नेने)

हयग्रीवाचार्य ऊर्फ हिरण्यगर्भ, अथवा हयग्रीव व्यास परंपरेप्रमाणें गोदातीरीं पांचालेश्वराजवळ राक्षसभुवन येथें राहणारे. त्यांचा काळ १२६५।७५–१३२४ असा डॉ. य. खु. देशपांडे व महाराष्ट्र सारस्वतकार देतात. इ. स. १३०९ मध्ये ते गोपाळ पंडितांचे शिष्य होऊन पैठणला राहिले. तेथें त्यांनी इ. स. १३०९–१३२४ च्या

दरम्यान हें स्तोत्र केलें असावें. या काव्यांत पेरोज व दमामा हे दोन फारसी शब्द येतात. अल्लाउद्दिन खिलजीच्या स्वारीनंतर असे शब्द येऊं लागलेले तत्कालीन अन्य काव्यांतहि आढळतात.

मराठीतली जुन्यात जुनी श्लोकरचना पाहूं गेल्यास पहिला क्रमांक महानुभावीय कवींना दिला पाहिजे. भास्करभट्टांचें मूर्तिवर्णन स्तोत्र व प्रस्तुत गद्यराज यांची रचना सर्वांत जुनी दिसते. गद्यराज नांवाचें भीष्माचार्यांचे एक स्तोत्र आहे त्याचा याच्याशी कांहीं संबंध नाहीं. भीष्माचार्यांचा गद्यराज त्या मानानें अर्वाचीन आहे. हयग्रीवाचार्यांच्या गद्यराजांत २७९ श्लोक आहेत. त्यांत कर्त्याचें नांव नाही. एक श्लोक लुप्त झाला असावा अशी समजूत असल्याचें कांहीं हस्तलिखितावरून दिसले काव्यांत कर्त्याचें नांव नाही तरी हें काव्य हयग्रीवाचार्यांचे आहे याबद्दल एकवाक्यता आहे व या गोष्टीबद्दल संशय बाळगण्याचें कारण नाहीं. या जुन्या श्लोकरचनेचा एक विशेष असा कीं श्लोक संस्कृतप्रमाणें नियमक आहेत. मराठीत ही पद्धत फारशी टिकूं शकलीं नाही हें उघड आहे.

या काव्याचें स्थूल स्वरूप पाहतां त्याचा नायक श्रीकृष्ण असून त्यांत (१) बाळक्रीडा व कंसवध श्लोक १–३३ (२) रुक्मिणी स्वयंवर श्लोक ३४–१८६ (३) जरासंध, शाल्ववध इत्यादि संकीर्ण कथा श्लोक १८७–२३१ व (४) लीलावर्णन, प्रशस्ति वगैरे श्लोक २३२–२७९. यांत श्री. चक्रपाणी, गोविंदप्रभूंच्याहि लीला आहेत. काव्य भक्तिप्रधान असून त्यांत वीरश्रीयुक्त युद्धवर्णनें पुष्कळ आढळतात. काव्यांत

"हातीं श्रीपद्ममाळा करित अवकळा चालतां राजहंसा
रुक्मीणीरूप पांता मदनशरव्यथामूर्च्छिता लग्न नाही" (१२७)

अशा सुरस काव्यमय ओळीहि आहेत. अनेक तऱ्हेनी हें काव्य अभ्यासनीय आहे

गद्यराजाच्या अलिकडील प्रती पुष्कळ उपलब्ध झाल्या, परंतु जुन्या प्रती मिळेनात. सुदैवाने श्री. व. स. तोंडोळीकर यांनी आपल्याजवळील श. १५९५ मधें नकलेली एक सुबोध वळणाचे अक्षर असलेली प्रत मला दिली. महंत आराध्य मुरलीधर शास्त्री यांनी कांही प्रती दिल्या त्यांत श. १६२१ ची एक प्रत होती. तिच्यात शेवटचीं कांहीं पानें नाहींत. श्री. कृष्णदास महानुभावांनी कांहीं प्रती आणल्या त्यांत शके १६०० ची एक प्रत, शके १६०३ ची एक प्रत व भीष्माचार्यांची टीप असलेली एक प्रत होती. या प्रतींचें अवलोकन केल्यावर असें दिसलें कीं श. १५९५ ची प्रत व श. १६२१ ची प्रत यांत फारच साम्य आहे व फरक किरकोळ स्वरूपाचे आहेत. शके १५९५ च्या प्रतीच्या श्लोकांशी वरील तीन जुन्या प्रतीं जुळतात असें श्री. कृष्णदास महानुभाव यांनी निश्चित केलं. या प्रतीं वरून असें आढळतें कीं वृत्तरचना अनेक ठिकाणी शिथिल आहे.

व वृत्ताची ओढाताण होते. यापुढील प्रतींत ही शिथिलता दुरुस्त करून ठेवली गेली व अनेक ठिकाणी जुने शब्द काढून अर्वाचीन शब्द घालण्याचा प्रयत्न केला गेला. या गोष्टी लक्षांत घेता श. १५९५ ची प्रत मूलभूत धरली व श. १६२१ च्या प्रतीतले फरक आणि इतर प्रतीतले महत्त्वाचे पाठ भेद शेवटीं टीपांत दिले आहेत अर्वाचीन प्रती शेकडो असल्याने सर्व किरकोळ पाठभेद देणें कठीण आहे व त्याची जरूरहि नाही. मात्र श. १५९५ पेक्षां जुनी हस्तलिखित प्रत कधीं मिळाली तर बरें होईल. श. १५९५ व श. १६२१ या प्रतींत जे फरक त्यांतला एक फरक असा कीं पहिल्या प्रतींत 'म्हणौनी' अशा सारखे शब्दप्रयोग अनेक ठिकाणीं वृत्तांत बसत नाहीत (श्लो. २१८) पण श. १६२१ प्रतींत तो शब्द 'म्हणउनि' असा आढळतो व तो वृत्तांत बसतो. अशा ठिकाणी दुसरा पाठ घेतला आहे. प्रथम प्रतींत 'ख' ऐवजी 'ष' 'न' ऐवजी 'ण' व 'ल' एवजी 'ळ' फार आहेत. ते सर्व बदलून करून घेतले. टीपेंत प्रतींचे उल्लेख खालीलप्रमाणें आहेत – (१) शके १६२१ प्रत– अ (२) छापील प्रत– छ (३) श्री. कृष्णदास महानुभाव यांचेकडील त्यांची स्वतःची प्रत – क (४) श्री. गोविंदराज महानुभाव वडाळा यांचेकडील प्रत – ग

प्रस्तुत काव्याच्या शब्दार्थ व श्लोकार्थ देणाऱ्या टीपा असलेली हस्तलिखितें पुष्कळ मिळतात. निरनिराळ्या प्रतींत शब्दांचे अर्थ भिन्न आढळतात. अनेक अर्थ उघड चुकीचे आहेत. तरी टीपांचा उपयोग करणें जरूर असतें. शेवटीं शब्दकोश जोडला आहे. त्यांत सर्वस्वी टीपावरून घेतलेला शब्दार्थ तसा दर्शविला आहे. अशातले शब्दार्थ एखादे वेळी बरोबर असतीलच असें सांगता येणार नाहीं. शब्दकोशावरून या काव्यांत जुने मराठी शब्द भरपूर असल्याचें दिसून येईल. 'रामेसी' (रामासहित) हा शब्दप्रयोग काव्यांत नेहमी आढळेल. 'रणउनि' (श्लोक २१७) हा एक विशेष शब्दप्रयोग आहे. हे श्लोक वाचतांना पुष्कळ वेळां नीट अन्वय लावून घेणें जरूर पडतें. अन्वय लावतांना निरनिराळ्या ओळीतले शब्द शोधावे लागतात. शब्दांची विभक्ती व्याकरणाप्रमाणे असेल असे नाहीं. 'वेणू पूरिले' म्हणजे वेणूनें पूरिले असें समजलें पाहिजे. अनेकदा निरनिराळ्या तऱ्हेनें शब्दांचे संधी केले जातात. ग्रसितवल्लिळा यांत अवलीळा शब्दाच्या अ चा लोप झाला आहे. शब्द निराळ्या तऱ्हेनें तोडल्यास कांही ठिकाणी अर्थ बदलू शकतो. काव्यांत अनेक श्लोक पंथिक तत्त्वज्ञानपूर्ण आहेत. या सर्वांचे विस्तृत विवेचन करून प्रत्येक श्लोकाचा संपूर्ण अर्थ खरोखरी दिला पाहिजे. परंतु हे एक स्वतंत्र व प्रस्तुत खंडाच्या उद्देशाबाहेरचें काम आहे. विद्वान् लोक या काव्याचा संपूर्ण परामर्ष घेतील अशी आशा वाटते.

यंदा महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळानें 'प्राचीन मराठी कविता' छापण्याबद्दल मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयास अनुदान दिलें. त्यांत तिसऱ्या खंडांत

बाळक्रीडा व चक्रव्यूहकथा ही काव्यें प्रकाशित झाली. आतां प्रस्तुत चवथ्या खंडांत गद्यराज पुरा होत आहे. आजारीपणामुळें हें काम करण्यास विलंब होऊं लागला परंतु हैदराबादचे महानुभावीय वाङ्मयाचे प्रकाशक व संपादक श्री. कृष्णदास महानुभाव यांनी संपादनांत मदत केल्यामुळें हें काम सुलभ झालें. श्लोक २४९–२५६ हे पंथिक तत्त्वज्ञानाचे असून त्यावरील टीपा त्यांनी करून दिल्या.

श्री. व. स. तोंडोळीकर, महंत आराध्य मुरलीधर शास्त्री, वडाळ्याचे श्री गोविंदराज महानुभाव यांनी हस्तलिखितें दिली. श्री. नागराजबुवा महानुभाव यांनी छापील प्रत दिली. उमरावतीचे श्री. ऋषिराज महानुभाव नेहमीं आस्थेने या कार्याची विचारपूस करतात. श्री. कृष्णदासांचे तर संपादनांतच सहाय्य आहे. प्राचीन मराठी कविता खंड ३ रा, प्रस्तुत खंड व पुढील दोन खंड यांना महाराष्ट्र सरकारच्या साहित्य संस्कृति मंडळानें रु. ४१२५ चें अनुदान दिलें. या सर्व संस्थांचा, व्यक्तींचा व मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संचालकांचा मी फार आभारी आहे.

—ज. शा. देशपांडे

रुक्मिणी निवास
पहिली गल्ली, हिंदु कॉलनी
दादर, मुंबई १४
दि. २९–१२–६५

# शुद्धिपत्र

| श्लोकाचा क्रमांक | पृष्ठ | मजकूर | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| १०।३ | २ | हात | हाते |
| २५।४ | ४ | गिरिमजरगडा | गिरिगजरगडा |
| २६।४ | ५ | इात | इति |
| २७।३ | ,, | सखजन | सखिजन |
| ३५।२ | ६ | सिहेसि | सिंहेसि |
| ५०।१ | ८ | माहसे | महिसे |
| ७८।१ | १३ | भाट | भाटा |
| ८९।१ | १४ | प | पै |
| ९८।४ | १६ | जथे ब्रह्य | जेथे ब्रह्म |
| १०८।४ | १७ | भ्रती | भ्रांती |
| १२७।४ | २० | मदन शरण्यथा | मदनशरव्यथा |
| १४९।२ | २४ | रणा | रणी |
| १५१।२ | ,, | पौंडिकावरि | पौंड्रिकावरि |
| १५८।३ | २५ | पर्वतीसम | पर्वतासम |
| १७०।४ | २७ | रकुकिया | रकुमिया |
| १७३।१ | ,, | वरिष्ट | वरिष्टा |
| १७४।३ | २८ | सुरश्शू | सुरइशु |
| १८८।३ | ३० | तापेनुतप्पू | तापेनुतप्नू |
| १८८।४ | ,, | पायराशी | पापराशी |
| १९९।२ | ३१ | कौरवेशूर | कौरवेशू |
| २०४।३ | ३२ | मिरि | गिरि |
| २२७।३ | ३६ | विदुथु | विदुरथु |
| २२८।१ | ,, | दक्षिण | दक्षिणा |
| २४७।१ | ३९ | लोकाधीशस्य | लोकाधीशेश |
| २६७।१ | ४२ | परतरगीत | परतरगति |
| २७८।१ | ४३ | प्रबुद्रा | प्रबुद्धा |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकृत
क्रमांक १५८६७ दि. ०५/०५
२०७६ दि. २२।३।८५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५५८९

# श्री गद्यराज स्तोत्र

श्री परेशाय नमः ॥ श्री जगदीशाय नमः ॥ श्री कृष्णाय नम : ॥

श्री चक्रपाणिचरणांबुजसेवका श्री- ।
नागार्जुना कृत मिया शिरसा प्रणमु ।
वाचा म्हणैन शुभनाम तुझे पवाडे ।
षड्वर्गदुर्ग नवनाथ पतीन नाथा ॥ १

यदुकुळटिळका श्रीअत्रिकुळप्रदीपा ।
द्विजकुळव्रतरूपा नास्तिविद्याप्रकोपा ॥
यतिमुनिकृतवेषा त्वां नमो सर्वशेषा ।
विदळितभवदुःखा चक्रपाणी सुरेखा ॥ २

राया श्री चक्रपाणी प्रकटित धरणी केली लीळा निराणी ।
नागार्जूनादिवाणी श्रुतपरशरणी कीर्तीता ज्या सुजाणी ॥
तीया सांघेण शुद्धा पर पति वसुधा क्रीडता पंचभेदा ।
जात्या त्र्य्या प्रसिद्धा नमिन पद चिदाधार चक्रेश्वराचे ॥ ३

कैसा देखै कृपाळू सजळधनतनू स्वीकरीली परेशे ।
बाळाघ्ने पूतनेतें प्रहरुणि शकटू भंजिला अंघ्रिघातें ॥
मातांकीं घेतला जैं सघनवटपणें रंगणी बैसवी तैं ।
आवर्ता वायुवेषातुरमरण रुपा दाखवीले मुरारी ॥ ४

जांभै देता मुकुंदा घन गिरी वसुधा देखिले तैं यशोदा ।
आस्यामध्ये अगाधा भयचकीत तदा मानिली भूतबाधा ॥
अंगन्यासी विशुद्धा श्रुतिवचनबिदीं फेडिली सर्व बाधा ।
धांधावृद्धां सुसिद्धा ऋषिमुनिविबुधा तर्पणें तोषु केला ॥ ५

गाऱ्हाणे देति गोपी व्रजपतिवनिता कोपली बाळकृष्णा ।
बांधे दामोदरातें न पुरति बहुतां दोनि बोटें समस्तां ॥

अंबा देखौनि खिन्ना स्त्रिकरण करि श्रीरंगनाथेंर्जुनातें ।
उत्पाटीलेंवलीळा सुरतरुपुरुषां दीधला मोक्ष दोघां ॥ ६

प्रातःकाळी यशोदा दधिमथन करी तेथ गोविंद मागे ।
क्षुत्क्षामस्तन्यपाणें सुतृपितु नव्हता ऊतले दूध देखे ॥
धांवे बैसौनि रंगी सकळ पयेमिठी दिधली तेथ आगीं ।
थेरे-कोपौनि रागीं दधिमथनशिळा फोडिली सीघ्र वेगीं ॥ ७

कृष्णाचा घालु रामें सहित संवंगडा घालितां नंदजाया ।
कोपें हातीं धरी तो म्हणेत मम मुखीं मृत्तिका पाह पां तूं ॥
मूखामध्यें ढिशाळा प्रचुरगिरि शिळा भूतळा ब्रह्मगोळा ।
गोकूळानाजि नंदू स्वसुतसहजनी दाखुनी भूलविला ॥ ८

जाला कूजाति कागें सकळ जन उगे पीडिले ज्या विसर्गे ।
त्याचे मोडौनि टांगें आणिकु अरि वेगें मारिला वत्सु रागें ।
ध्यानें जीवां कुदृष्टी बकु धरूनि मुखीं फाडिला चांचुपूटीं ।
रामातें नेत पाठीं गतगगनतटी दीव्ही मीठी मळंबा ॥ ९

नंदादीकीं महेंद्रा सुयजन करितां वारिलें गोपिनाथें ।
क्रोधें शीळा निपाती त्रसित सुरवरें देखिली गोकुळस्थें ॥
ळीळा डावेनि हात प्रचुर गिरिवरें दर्प गोवर्धनें तैं ।
झाडी इंद्रादिकांचा सळ बळ अदटा दाटुगा दादुला जो ॥ १०

वांबाग्नी गोप गाई व्यसु जमुनेतटी धारिली देखुनिया ।
क्रोधें चक्रेश्वरू तै सखिजनसहितां काळिया सीख लावी ॥
काळा धाटी सुये जो हृदयगहनफणाटोपनृत्ये सिहाणा ।
राणा श्रीकृष्णराजू स्तविजतु युवती प्राण राखैंतकाचे ॥ ११

लांबा तांबागि जाळी पशु शिशु कवळी होतसे विश्व होळी ।
त्यातें लीळाचि गीळी अतुलवल बळी कृष्ण गोपीस्तवीता ।
दूजा मुंजाटवीये ग्रसित संवंगडे पावका देत मीठी ।
सृष्टी धेनूकु वीरु खरु वधुनि परू व्योमरिष्टांतकू जो ॥ १२

महा व्याळे अघें जै ग्रसन षशु शिशू देखतां कृष्णराया ।
केलें तें पोटफाडे अरिदळ विघडे आपुली राखिली तैं ।।
गोपाळा देवदैत्यां सकळजनचया देखतां मोक्षु दील्हा ।
तेजोराशीपदांब्जीं विलसत जमुने दुष्टदर्पघ्नु आला ।। १३

ब्रम्हा चोरी करी जै सकळ गिरि दरे पाहिले नंदपुत्रें ।
ना देखे गोपवत्से स्वबहुरुपधरु वत्सरू येकु जाला ।।
चौतोंडा पाउ ठेला दधिकवळकरू नाटकी नाटयरावो ।
ठावो नाही तयाचा चतुरवदन बहू दाखुमी भूलवीला ।। १४

मागां पूढाडवांगी न ठकत न मरी केशिया अश्वरूपू ।
येरासी मूर्त काळू गिरिसम वधुनी कृष्णराजा विजैया ।।
भार्या दीक्षार्थिकांच्या सुतृपित करुनी गोपिनाथासि पुण्या ।
पुण्या सेव्या पतीसी सुखकर परमानंदप्राप्तीसि योग्या ।। १५

नंदार्थी श्रीमुरारी सुवरुण नगरी पातला तेथ नेणें ।
पूजीला दिव्य रत्नीं सुरतरुकुसुमीं पुष्पजाती अनंती ।।
आश्चर्ये नंदु मानी प्रभु धरुनि मनी कृष्ण सामान्य नोहे ।
दिक्पाळू पश्चिमेचा प्रणमित चरणा राख कृष्णा ह्मणौनी ।। १६

नाना पुण्यें अनंतें न गणति सुकृतें देवता तेहि तोषे ।
आल्हादे स्थान पावी तिथचि न दखवी लोक आणूनि जीवां ।।
नोहे श्रीकृष्णु तैसा व्रजपति सरिसा विष्णु वैकुंठ आणी ।
गोकूळमाजि सर्वां प्रकटित सुजिवां प्रार्थिला नंदगोपीं ।। १७

नग्ना बाळा जळांतू विहरण करिता देखिलें नंदपुत्रें ।
वस्त्रेंसीं वृक्षरुढु स्तविजतु अबलीं हाकरी लज्जितातें ।।
आलीया हस्त वस्त्रा मग ह्मणतु हरी नीडळीं हात ठेवी ।
वंदा मातें स्वभावें स्मितुकृतु सुमुखीं दीधली गोपिनाथें ।। १८

वेणू श्रीचक्रपाणी अमृतधवधनी पूरिलें विश्व वाणी ।
कामाल्या कामबाणी व्रजयुवतिगणी सांघणी मन्मथाची ।।

गौरा श्यामा प्रकृष्टा उभय कुचतटामाजि मारा वसैठा ।
लाठा सौधा सुभद्रा मदनकटितटा वंकटा भूविशिष्टा ॥ १९

नादें विंधा मुरारी प्रियविरहभरी पीडिता गोपनारी ।
केली भातारचोरी स्वशिशु परिवरी बैसुनि चालिलीया ॥
चंद्रारश्मिप्रकाशें वनपथ सुरसें कृष्णगीतें निराशे ।
जाली चित्तें परेशें गृहपतिनिरसें अंतरें पांति कृष्णें ॥ २०

तारुण्याचेनि ज्वरें नमित कुचभरें कामिनी काममारें ।
ऐसें केलें उदारें हृदय सधिमिरें जर्जरें स्त्रीजनाचीं ॥
गोपीवृंदें अपारें गवसन करिता देखिला गोपिनाथू ।
हातें हातू धरूनी स्वकिय भुजलतीं देत आलिंगनातें ॥ २१

कंसे श्रीकृष्णरामा अवमति मरणा मूळ धाडीक्रुरातें ।
तेथें डांगा फरारे सकळ संवगडे सिंहनादें निगाले ।
जा रे जा रे प्रतापे अडदर असुरां पातला कृष्णु कोपें ।
आले नाना स्वरूपें अघखगखरादी मारिले दैत्य सांपें ॥ २२

मोडीला शंखचुडू अरिजनविघडू दुर्जना जो दुआडू ।
ब्रह्मादीकांसि वाडु दनुजकुळकडू झोडु कंसादिकां जो ॥
आला आला पळा रे प्रविशत मथुरे गर्जताती स्वभारें ।
गांवामध्यें अटाटा गजघट वरिठा लाविला काळवाटा ॥ २३

पाठीं कार्मूक भंगी असुरचय वेगीं पातले वंशडांगीं ।
टांगीं चूर्णायमानें रिपुकुळदहनें घेतले प्राण शाले ॥
मार्गीं कुब्जार्चिला जो सुरतनुरमणी भोग्य देवासि केली ।
सायान्ही गोपिनाथु विचरतु नगरीं मेलिकारासि आला ॥ २४

प्रातःकाळीं निनादें कुवलये सरळें गर्जतां सिंहनादें ।
नाना वाद्यंत्रशब्दें प्रकुपित वसुधे चालतां कंपु आला ॥
केला कैवाडु पूढा प्रकुवलय पिडा वेंझ देता सुगाढा ।
त्याच्या मोडूनि दाढा गिरिमजरगडा मालखंडा प्रवेशे ॥ २५

रंगी ऊभा मुरारी सकल पुरवरीं देखिला तेथ नारी ।
कंदर्पू काळवैरी शिशुवत पितरीं ईशु सूरीं समस्तीं ।।
भक्ता स्वात्माप्रतीती नृपवरु नृपती ज्ञानियां ज्ञानमूर्ती ।
विद्यावंतां स्वयुक्ती पुरुष इति मिती पौरजातांसि भिन्ना ।। २६

रामेसीं गोपिनाथे कवतिक येक तेथें देखिलें ऊर्द्धपथे ।
कंसाते नत माडी सखजन वऱ्हाडी गूडरीं घालुनिया ।।
वाद्यंत्रे तें मडौरें मग म्हणत करें माल ते ते रिगा रे ।
येरे सुस्थे राहातू असुरजनचया वाढता हात पांतु ।। २७

बोल चाणौर कृष्णा मज तुज भिडतां भोजराजे पल्हावे ।
गर्व गेलासि थोरू वधियेलें किडरुं वांसिरू पांखिरू पै ।।
काउळें ढोर तट्टू तेगें तुज सविया थोर आला श्रिमाटू ।
आतां काढीन घोटू अरिगजअदटू कोपला कृष्णु चाले ।। २८

जाली दोघांसि आटी चडकून विकटी हाणताती सुघाटी ।
पाठीं पोटी ल्लहाटी तळवरनिहटीं भीडतां मल्लविद्या ।
हातीं हातांसि वेणी विघडित पिळनी पाइं पायांसि तेथे ।
चाणौरू मुष्टिघातें रणपतितु कुंथें मारिला मुष्टिकेसी ।। २९

हाका गर्जे मुरारी हळधरु समरीं तो सळें सीसळेंसी ।
विंदाने त्यासि मोडी मग पडत उडी धाडि कंसासुरातें ।।
गोपाळे कंस कोपे धरुनि शिरलटी भूतटीं पाडिला तो ।
क्रोधें मेलाचि मारी अरिकदन करी पारणें प्रेतभूतां ।। ३०

येरां मालां प्रलंबा कपटनटधरां सोडिल्या येक बोंबा ।
लांबा जाळी कुटुंबां हृदय दहनकरें जाळिले दैत्यजांचे ।।
जे जे दर्पिष्ट गाढे कपटनट कुडे ते केले आडमोडे ।
दाढे काळाचि येथें क्षपण जरि घडे ऊघडे वैर कृष्णीं ।। ३१

केला दैत्यासि मारू वसुदेवकुमरू शीघ्र बांदौडि आला ।
फोडीली बंदिशाला वसुदेव जननी श्रीपती क्षेम देती ।।

जाली आनंदपूर्णा सुरमणि मथुरा उग्रसेनासि दील्ही ।
प्रेम श्री उद्धवासी सुतृपित नयनीं, केलि राज्यव्यवस्था ।। ३२

छेदीले वनकंटक दैत्य फरसें स्वांगें सुतीक्ष्णें स्वयं ।
पाळीले वनचंदनस्तरु यदु पूरीत कृष्णामृतें ।।
स्थापीले सुर सर्वदा निजपदीं श्रीकृष्णराजे प्रभु ।
ज्ञानी भक्त भवाब्धि तारित बहू त्या चक्रपाणी नमो ।। ३३

× × ×

कंसास्त्रीयातिदु:खें तळमाळित जरासंददेशासि जाती ।
गाऱ्हाणे देति बापा पतिविरहरूषा खेदखिन्नातिरोषें ।।
गोपाळें कंसघातू करुनि पढवितू वैरियां काळकेतू ।
दृष्टीते याचि येतू जिवंतुचि चरणी कापुनी घातलासी ॥ ३४

अस्ति प्राप्ती कठोरें कुवचन निबरें बोलती मागधासी ।
सांडी मागील्लु ताठा नव्हती गजघटाथाट सिहेसि जैसे ।।
तुह्माऐसीं अपारें पशुवतु असुरें मारिली थोरथोरे ।
येरें लेखींचि नाही सुर नव्हति कहीं गौळियां यादवांसी ।। ३५

ऐसा कूबोलबाणीं हतु वरि धरणी कोपला मागधेंद्रू ।
जैसा कां सिंधु क्षोभे घडघडितु सभे जेवि काळाग्नि रुद्रू ।।
नाना भूतांसि श्रिष्टा प्रळयकरु कटा हिंफुटा दिव्य वर्गू ।
जाला घे पैज लाठा यदुकुळकुरुठा जाळिन वाडवाग्नी ।। ३६

ताम्राक्षी धूमऊका पळिपत असिका गाजना होत मेळा ।
भूपाळां मंडलीकां गजरथकटकांमाजि घोडा पदाती ।।
चातूरंगे निशंकां अरिझडपटकां नेटका नीट योधी ।
आक्षोणीतें त्रिसेशीं समबळ गिवसी एकु कूकेतु जैसा ।। ३७

ऐसी सैन्यें अपारें झडकरि मथुरे चालिली सर्व भारें ।
दिग्पाळी पैं संव्हारे वसवित कुहरें चालतां मागधेसी ।।

नीशाणाचे निनादें घनु थिरुशब्दें तांब्रकीभेरिभेदें ।
दामामी वैरिखिदें तुमळरवमदें पातले राजपीढी ।। ३८

जेऊती दृष्टि फांटे तेउतिचि अदटें चातुरंगें अचाटें ।
जैसी कां काळकूटे वमित अरबटे राउताळीं अफाटें ॥
पायांचां उग्रथाटी सहयगजघटीं स्यंदना चक्रवाटीं ।
आबूठी धूळिरेवीं ग्रसित सकळही देखिले यादवेंद्रे ।। ३९

आपूली ग्लानियूतें गजबज करिते जाणुनी गोपिनाथें ।
देखीलें दो रथांतें वरि गगनपथें येत दिव्यायुधीसी ॥
बोलीले वृष्णिपाळें हळधर मुसळें मागधां झोड देई ।
वेताळां प्रेतभूतां रुधिरपयरतां चौहटीं तोषवी तूं ॥ ४०

देवाचा बोल कानी पडतचि मनी कोपला काळरूद्र ।
रोहीणीगर्भ पंचाननु चढत रथीं दूसरा कृष्णराजू ।।
कोल्हासी सिंह जैसे गजरथसरिसे चालिले अल्पभारें ।
आतां जा रे पळा रे असुर अडदरे फुंकिला पांचजैन्यू ॥ ४१

शंखानादें प्रचंडें गिरि धरित तटे पृथ्विदाढे वऱ्हाहा ।
हाहाकारू त्रिलोक्यीं अरिदळें असिकी मूर्छितें लोळवीली ।।
हा हा हे काइ जालें वरि तडक भलं वज्र कोडी अनंता ।
आतां संहार काळू करित जगबोळु पातले रामकृष्णू ।। ४२

देखीले मागधंशें यदुविर सरिसे काळु कासेति सोटा ।
ऊधट्टा चावटांसि खलबळचपळां वाडवाग्नीसमाना ।।
नाना ते सूर्य जैसे अरि निशित घंस पीळतां पाडु नाही ।
कीं ते मारूतव्हो दितिदनुजवना लागले दैत्यमूळीं ।। ४३

क्रोधें आला समोरा वसुदेवकुमरापासि येऊान बोले ।
तूसि संग्रामु नाही घडु नव्हेसि कहीं लोकांचा राखिला तूं ।।
मार्सा रामेसि नेट्टू जरि होय अदट्टू लाठु दोघा समानू ।
नीट्टू सुभट्टु तो मी यमदुतु नियमी दासिरु एक माझे ।। ४४

बोले श्रीचक्रपाणी मज तुज धरणी झुंझता पाडु नाही ।
हें साचे बोलिलासी ग्रसित मम असी तूज ऐसी अपारें ।।
ऊदानांचा सुकाळीं बडबड जवळीपासि ठाऊनि घेती ।
तैसे तूं जल्पतासी म्हणउनि रवसीं वाइले रामकृष्णीं ।। ४५

पायें हाला सुदीर्घू सरळत उरगू मागधू तेत्रि जाणा ।
सैन्ये दोन्ही सिहाणा तुमळ रव रणामाजि हाका निनादी ।।
झुंझी पाचारितातो आहणत निशिथीं बाणघाती पदांतीं ।
हाथीं हाथींच वेन्हीं मुगवित समरीं केतुकाळासि रूठे ।। ४६

गेला गेला भुगोळू महि धरित तळू आदळू दोंदळांसी ।
माहा संहारु भूतां प्रळयकरु आतां क्षोभला भूतनाथू ।।
तैसा गोपाळु दीसे भरित रिपुघसे कापखंडी कुन्हाडा ।
गादा दृढ प्रहारीं रगडित समरीं दापुगे दुष्ट वैरी ।। ४७

सारंगाचे निनादें त्रसत रणमदें मातले जे असुद्रें ।
पीती सात्वी कबंधें घडघडित रणीं धांवती यादवांसी ।।
सौनंदें कामपाळें अति अतुलबळें कोंवळीं पैं कपोळें ।
घाऊ दे घातऊनी गजरथ धरणी चूर्ण वाटूनि केले ।। ४८

कृतांता भूत मोडी कसकस रगडी मागधां शीर झोडी ।
मूहाडी थोर कांडीं गजतुरग धडीं लोळतां भू तडाडी ।।
कैसा तो वृष्णिपाळू अरिदळकवळू प्राण तोषा न पूरे ।
हातीं तृप्तीचि नाहीं यमु भियत पईं घाय कोल्हाळ शब्दां ।। ४९

घाये बोभाति कैसे रेंहकत माहसे भुंकेत खर जैसे ।
जैसे फूत्कार सर्पां भुडभुड उदकां कुंथ हुंकार एकां ।।
एकां अंभोधि गर्जू गिरि तडक उजू वीजुनिन्हाद मेघी ।
आंगीं लोंढे असुद्धां जळचर विविधां देखती वीरगंगे ।। ५०

कूर्मांचा वेषु शीरां, झष सदृशकरां साम्य सोंडा अपारा ।
सर्पाकारा गजांच्या, सुसरअरिउदरें, तारुवें पैं रथांची ।।

मुक्तेंलंकारवाळू, करांगुळिक जळू, केस सेवाळुवांचे ।
आवर्त्त कार्मुकांचे जळकेळि विचरे यक्षिणी क्षेत्रपाळा ।। ५१

ऐसा संग्रामु थोरु बृहद्रथकुमरू एकला ऊरला तो ।
काळाचा पाडु नाही. नव निशित तेहो सेळितू यादवांतें ।।
देवें कोदंड भाते शरभरण तेथें छेतीसें दंडशस्त्रें ।
छेदीलें सारथ्यातें, रणमदत्वरितें ऊडि घाली रथौनी ।। ५२

रामूही घालि ऊडी करपुट रगडी पर्वतातें जहांचे ।
ते दोघै मुष्टिघाती आहानत विरथी होउनी सिंह जैसे ।।
नुरहाटे एकु एकां आहानत थडका त्रास पाताळलोकां ।
भीया सहस्रशीर्षा जरासुतु कटका त्रैलोक्या नांगवे तो ।। ५३

वज्रांगीं वज्रमुष्टी आहाणत सुमुठी होतसे घायसूटी ।
लाठा श्रीकृष्ण भूमी म्हणउनि हिंपुटा मागधु पाडिला तो ।।
बांधौनी ऊर फुंठी तडतडित उटी तेव्हेळी पांशि बांधे ।
वारूनी चक्रपाणी मोकलुनि धरणी सोडिला कार्यहेतू ।। ५४

गाळीले दैत्य घाणा सकळ रिपु रणा आणिले कृष्णरामी ।
स्वामी ब्रह्मादीकां जो स्तविजतु मथुरे यादवेंसीं प्रवेशे ।।
आनंदे पूर्ण लोका प्रभु यदुटिलका दर्शणें देंति भेटी ।
वोबाळी रत्नदीपीं यदु युवतिगणी स्वामि नागार्जुनाचा ।। ५५

अतुलबळचपला मागधा काळकेतू ।
करित कुवलयपीडा भोजराजा निपातू ।।
खगनगवृषकेशी धेनुका प्राणघातू ।
रिपुकुळकदना श्रीकृष्ण राया नमोस्तू ।। ५६

श्रीकृष्णे मगधेश्वरु दवडिला तूं जाय रे बापुडें ।
मुंगी रांड नव्हे जयाचेंनि तेणें वृष्णी केलें घाल्णें ।।
नो मोडे तृण चालतां वरि क्षिती संग्रामु त्या केउती ।
लाजा हिंपुटि होउनी न मर रे धिग् जालि तूझीं मती ।। ५७

ऐसें शब्दकुठाराभिन्नहृदयो मार्गी म्हणे मागधू ।
पापाचे गिरि संचिता जरि भले होता जरि कां वधू ।।
गोपाळें रणिं बांधुनी मग देखा बोलौनि वाक्य कुडें ।
आतां तापस होउनी वर वनीं हें देह पाडू फुडें ।। ५८

बोले दुःखकुलानले कवळला शोकाकुळू येकला ।
लाजा प्रौढ मुखावरी वनवला तो देखिला भूपती ॥
बोधीला निजवैडुरी उशनसीं कामादिकीं जीवजा ।
राया तूं म्हणे दुःख मानिसि आतां होसी विजैया सुता ॥ ५९

काळाची गति विचित्र जाणत आतां निसत्व घाली हियें ।
साभीमानशिरोमणी तुज सदा कृतांत तोही भिये ॥
आतां चाल सळें प्रतापधवळें तूझेनि येशे मही ।
आपूरीत, सुरादिकीं न जिणतां जीणोचि नाहीं कहीं ॥ ६०

ऐसा पाव्य सुखामृते हरिषितू पूरासि ये मागधू ।
पृथ्वीपालकचाळ भूतल क्षणी तेवीस आक्षोहिणी ॥
मेळा मेळुनि चालिला न गणितू कृतांत भूतावरी ।
पूर्वीलापरि बांधुनि दवडिला माहाविरीं माथुरीं ॥ ६१

ऐसा तो दळ मेळऊनि सतरा वेळा एतां आतुरां ।
चांगावे नव्हेचि मागधविरां शीरां धडे लोळती ॥
मांसाचे गिरि वाहती वरि धेरे गंगाजळे रुधिरें ।
साभीमानपणें पुणः पुण म्हणे संग्रामु केला तेणें ॥ ६२

मागौतें दळ मेळऊनि मथुरे चालैल लाठेपणें ।
पूर्वी नारदप्रेरितू यवनु जो तो पातला तत्क्षणें ॥
म्लेंछा लक्षशतत्रइं परिवृतू देखौनि तो अच्युतू ।
चिंती मागधु पावईल त्वरितू पूरी रचूं सागरीं ॥ ६३

श्रीमद्वारावती पवित्र नगरी जे निर्मिली श्रीहरी ।
निद्रीस्तु जन आणुनी परिकरीं निक्षेपिला मंदिरीं ॥

पाठीं तो मुचुकुंद चक्षुदहनें भस्मीविशेषु केला ।
चक्रेशू वरदान देउनि तया राजाधनी पातला ॥ ६४

तेथें रोहिणिनंदनें नरविरें म्लेंछासि हो जे पुरे ।
केली मूसळ नागरें हृद सरें आपूरितें रुधिरें ॥
पाठीं चालतु साग्रजू हरि सुखें नेतां धन द्वारके ।
मागौतें जवं पांति पश्चिम दिशे ते देखती पारके ॥ ६५

आला मागधु जाणऊनि समरीं ऊभा नव्हेची हरी ।
रीगाला बळदेवसंयुतु गिरी टाकूनि आला वरी ॥
एरें पर्वतु वेढिला कवळुनी जाळीतसे पावकें
रामेंसीं परमेश्वरू नभगती आले श्रिमद्वारके ॥ ६६

सुरवरवरदानें मंत्र पुत्रू जरेचा ।
प्रहसितु नगरासी येउनी सुस्थ मनी ॥
वसुदेव सुतनयो श्रीकृष्ण सत्या सुरांतें ।
करुनि यदुनगरी राज्य पाळी यदूचें ॥ ६७

× × ×

कौंडण्यापुर पीटिका करुनियां वैदर्भदेशाधिपू ।
तेथें भीमकु राज्यपाळकु देखा कन्ये वरु सारिखा ॥
नाही तेव्हेळि चिंतितू नृप सभे क्षोभे अनंगू जिये ।
कन्यारत्न विचित्र नागरतनू कोणा दिजे रुक्मिणी ॥ ६८

चिंतावस्तु परिवृतू नरपती उत्संग कन्या स्थितू ।
तेथें भाटु चराचरा विचरतू देखौनि पूसे नृपु ॥
तूंडी पाड सळें बळें प्रतपतू रूपें भला अच्युतू ।
नागारां सांवर्ता वसूदेवसुतू श्रीकृष्णराजा असे ॥ ६९

द्वारावती पुर सुवर्णगृहीं विभागीं ।
गोमेदरत्न सुरसेवित पद्मरागीं ॥

चिंतामणीघटित जे मिरंव सुरंगीं ।
तो दैत्यसूदनु जगीं करि राज्य तेथें ॥ ७०

जो धट्टकठ निवटी सकटीं अवेवीं ।
वैरीगजांकुश नवी बरवी वपू ते ॥
नीलोत्पलस्तबकभाद्भूत तुच्छ देखा ।
सैंदर्य सर्वयुगता न द्वितिय प्रभूचें ॥ ७१

जेणें शोषण पूतना करुनिया गाडा पदें मोडिला ॥
आवर्तूगळ मोडि मारुनि बका धडीं मही पूजिली ॥
कागाकंठ कुठारपाणि वसुधे अतृप्ति दैत्यांवधें ।
क्रोधें गाढवु धेनुकु वधुनियां केशी ग्रसीला जेणे ॥ ७२

उत्पाटीत तरुद्वय नरवरू देऊनि दामोदरु ।
वत्सासूरु निपातिला अजगरु नंदग्रसी मारिला ॥
काळीया विष ओकुनी दवडिला क्रोधें अघू फाडिला ।
दैत्यां दारुण चंखचूडु वधुनी व्योमू भुमी घांसिला ॥ ७३

ब्रह्मा भूलविला प्रतापशकती इंद्रादिकें केउतीं ।
मेली आणुनि दान दे सुरपती चक्रादि हातीं जया ॥
अग्नीज्वाळ विशाळ गीळित कदा ब्रह्मांड मूखीं सदा ।
दावी पूजित वारुणें दिगपती घातीं अरिष्टासुरा ॥ ७४

चाणौरा रवदोळि मुष्टिक बळा, शाळे धनू मोडिले ।
खिखीयाट परीयटु निवटुनी कुब्जे वरू दीधला ॥
हस्ती पर्वतसादृशें रगडितां पृथ्वी तडाडी देखा ।
माला तो सळ काळजे सडकिआ फोडीत एका नखां ॥ ७५

कंसाचे शिर मोडुनी रगडितां तेवीस अक्षोहिणी ।
बाणा कूट करुनिआं स्व सतरा वेळां विरां आणितां ॥
कृष्णाचा शर सांटतू जरि दिसे काळादिकां फोफसें ।
पाडी तेथ जरासुतूचि केउता निभ्रांत तो ये वरु ॥७६

म्लेंछा भस्मकु दृष्टिपात युवना पञ्चातविद्या जेणें ।
राजा कृष्ण चराचरीं पढिजतू श्रीमंतु लाठपणें ॥
पृथ्वीभारकुठार दैत्यरगडा माताइते पाउडा ।
गाढा दर्प सुरासुरां हर करु निभ्रांत तो ये वरू ॥ ७७

लीळानंतु परेश्वरू विवदता भाट अवस्था सभ ।
क्षोभे भूपति सर्वथा सकळहीं ताटस्थ सर्वां जनां ॥
जैसा ज्ञानदयाप्रकाशकरणी प्रमादवाणी ने घे ।
रुक्मा तेवि मज प्रकाशतु दिसे श्वासेंति दीर्घ स्वासें ॥ ७८

क्रोधें पावक धुंधुके नयन तो रुक्मी सभे गर्जतु ।
गोपाळें दधितक्रविक्रयजिवी स्वेच्छावसें वर्ततू ॥
लाठा धांवतु मागधां पुढपुढां गाढा समुद्रीं रिगे ।
आंगें काजळ डोंगरु बुमथला वातासि सेवी भला ॥ ७९

भाटें वायट चावटें बडबडां आम्हा पुढां वानिता ।
क्षत्री जाति नव्हे कुळासि निरुती गौळी प्रतिती नव्हे ॥
राजा शुद्र कुळाभिमान सरळू नाही प्रतापा सळू ।
काळू काळजा वाहे ज्या अतिबळू तो शीशुपाळु वरू ॥ ८०

रुक्मीया भिडभीतु भिमकु म्हणे वेगां किजे चाळणें ।
शीशुपाळ निरक्षणें मग तेणें हो भाष केली क्षणें ॥
नागारीवचने सभे प्रियतमू आत्माभिरामू हरी ।
कर्णद्वाराजिव्हार भेदित क्षणीं वेधामृते रुक्मिणी ॥ ८१

आठै सात्विक बाष्प मुख्य कुमरी ताटस्थ्य वैवर्णता ।
कंपु स्वेद सगद्गदादि करिता रोमांच गात्रस्थिता ॥
आनंदाश्रुपरिप्लुता सुभरिता श्रीमंत वैदर्भि ते ।
रुक्मीवाक्यकुठारभिन्नहृदयो जाणौनि बोले द्विजू ॥ ८२

माते तूं श्रुत दुःखदारुणरता चिंताप्रसोताप्लुता ।
ताता श्रीपरमेश्वरू यदुपती श्रीकृष्ण जीणें तेणें ॥

चिंतासागरु तारिळ त्वरितु तो श्रीचक्रपाणी फुडे ।
वीडा देउनि पाठवी जननियें आर्णान पैजा फुडां ।। ८३

जात्याश्वावरि चाळतू द्विजसुखें आला श्रीमद्वारके ।
हरुषें प्रभुसेवकें चरण ते आलिंगिले उत्सकें ।।
श्रीकृष्णें द्विज पूजना करुनियां येकांतु दोघां तेथें ।
बोले देउनिं वीनती सुदे ॐ ते वार्चायली अच्युतें ।। ८४

स्वस्ति श्री वसुदेवनंदन परा श्रीकृष्ण चक्रव्रती ।
साष्टांगीं प्रणिपातपूर्वक तुम्हां लोटांगणी श्रीपती ।।
रुक्मिणी तुज सांघते विनवणी श्रीचक्रपाणी प्रभू ।
आर्त्तत्राणपरायणा तव गुणी माल्हाथिलें चित्पती ।। ८५

बंदीजनी तव लीळा कथितां मुरारी ।
तापत्रिकूटगिरिवज्रविदीर्णकारी ।।
सौंदर्यसिधु हरुनी सकळ प्रकारीं ।
मातें स्वकिंकरि करी तरि जीन नाथा ।। ८६

हें जन्मदान तुज देइन चक्रपाणी ।
धांवै क्षणी विरहिणी त्रय तुच्छ जाणै ।।
येसी म्हणौनि धरणीवरि देह वांचै ।
साचे त्यजीन तनु तें तुजकारणें जी ।। ८७

मी शोच्य दासि करितां तुज लाज पाही ।
आर्तासि धावसि कंही जरि तूं परेशा ।।
ते आंकणें स्मरउणी जरि पावसी श्री –
चक्रेश्वरा शरण मी अनिमीतदानी ।। ८८

तूझी म्हणौनि जनकें कृतनिश्चयो प ।
रुक्मे निषेध करुनी शिशुपाळ मानी ।।
जंबूक सिंह बळि घेउनि जेवि जाये ।
वीपाये नय्यसि जरी तरि लाज कोणा ।। ८९

मेघश्यामा कमळनयना पात्र तूं स्वात्मरामा ।
तुम्हा जी मी सकळ त्यजुनी किंकरी सर्वभावीं ॥
निर्धारुनी जरि तुज मनीं पात्र सर्वज्ञनाथा ।
आर्ता सिंधू दमघोषसुता बूडतां हात देई ॥ ९०

सुकुशल नृपकन्ये तोषला कृष्णरावो ।
आवसरु तेथ पूसे विप्र सांगे सुदेवो ॥
करधृतावटिका जी दग्धता हस्तदाघें ।
न वचत न सरेता बोलिले पैं श्रिरंगें ॥ ९१

दारूका रथ आणुनी झडकरी दूरीचि ऊभा करी ।
दूजें नेनत चालतां मज तरी निभ्रांत जाणे घडे ॥
संकेतें द्विज चक्रपाणि निगतां कोण्हां नव्हेचि श्रोता ।
पाठीं रोहिणिनंदनू अवचिता राजा सभे आइके ॥ ९२

राजा रोहिणिनंदनू झडकरी छपन्न कोडी विरीं ।
संयूती रथ चालता गजतुरीं राऊत भारी टका ॥
पायाळीं महिमंडळीं गगन जें आपूर्ण सर्वे रजें ।
क्षेमालिंगन दीधले निजपती श्रीकृष्णराजे यदू ॥ ९३

पीढी पावत पावतां सुरपती श्रीकृष्ण चक्रव्रती ।
विप्राते मग पाठऊनि झडती चिंतार्ति रुक्मिणिये ॥
गूढी ऊभुनि चालिलाति हरिपें आश्चर्य तेथें देखे ।
दैत्या दुर्मद लक्ष वारि कटकें घोषें गिरि गाजती ॥ ९४

तेथें चैद्य वऱ्हाडिकें दमघोषें येणें केले मारके ।
शाल्वू मागधु पौंड्रिकू कवतिकें काशेश्वरू बल्बद्ध ॥
भौमासूरु विदूरथू मुरु सवें बाणासुरु आघवे ।
पींढू दुर्विद दंतवक्रु सुरवे जे ऊरले मारितां ॥ ९५

चैद्या पक्षिणि चौड गौड सकटैं सूदाक्षिणादी सुते
माथे तूकितु विस्मयो करितु तो सुदे ॐ देखे तेथें

ऋक्मीणी गिरिगह्वरें प्रजळतां कीशोरि मृगीस्तथा ।
चैद्याग्नी अति दारुणे खिरडतां प्राण त्यजूं पांतसे ॥ ९६

सारी सारि गुढी करीं धरुनिआं आला आला ब्राह्मणू ।
कीं श्रीकृष्ण गुढीमिषें प्रकटला कीं प्राणु ऋक्मीणिये ॥
आनंदाश्रुपरिप्लुता चरण ते माथां धरी भीमकी ।
आल्हादें धवलगृहेचि असिकी ते माय ना नोवरी ॥ ९७

पाठीं विप्रु परेश्वरू कथितसे कामू रुपें धापिसें ।
शौर्ये दैत्य करी तणासि सरिसे तो पातला यादवू ॥
तूझा वल्लभु वानितां कवतिकें रंकें स्वरूपें सुरां ।
जथें ब्रह्य पुरंदरां अवसरु नाहीं महेशादिकां ॥ ९८

ते ऋक्मिणी मग म्हणे तुज ऊतराई
जन्मांतरी नव्हे कंहीं प्रभु विप्रराजा ॥
श्रीकृष्णराजु मज मेळविला सुदेवा ।
जीवां कंहींचि न टके मित साधनी जो ॥ ९९

देयावया तुज जरी असता मुरारी ।
दूजा तरीचि उपकारु समानु होता ॥
आतां समस्त करणें मज तूज कांहीं ।
नाहीं नमस्करणेंवांचुनि विप्रराजा ॥ १००

ऐसें म्हणौनि चरणीं पुडती पुडती ।
लागौनियां रकुमिणी म्हणते द्विजातें ॥
श्रीकृष्णराजु मज दाखवि शीघ्र वेगें ।
भद्रावरी नृपसुते द्विजु दाखवी तो ॥ १०१

एतूलां गिरि गाजती दरकुटें वाद्यंत्रशद्बोत्कटे ।
घेरी वैरिविदारणा अरबटें शिंगें रणीं वाजटे ॥
नीशाणीं रिपुमारणी खरसिंगीं भेरी तुरीं मांदळी ॥
कासोळीं रणमोहरीं भयंकरीं तोंडीं खरीं गाजना ॥ १०२

दामामी मदमस्तकें सुटिविला घांवाळ शंखारुवें ।
पावे तांबकि बोवडो रणगजां घंटा भटां त्रासका ॥
काहाळां रणमारकां डंउंडिचीं वैरीदला पावकू ।
नाना शब्द नभीं तुमूळ करडे होर्डे ध्वनी फूटती ॥ १०३

पाठीं ते दळ देखिले क्षितितळीं घे मारि भूतावळी ।
व्योमातें यदुवीर शस्त्र कवळी भूपाळ ते देखती ॥
श्रीकृष्णा प्रतिपक्षिये असुर जे त्यां कांपती काळजें ।
आलोचीत बिजें सकाळिचि किजे तैं वाचिजे यादवां ॥ १०४

आला यादव कोण साहिल रणीं वृष्णी भडाडू देती ।
सांवनें जरि चालतील रंवसें चेंडू शिसें ग्वेळती ॥
नावें आंतकु घोंटतील कटका कुःकर हाका नुरे ।
ऐसा कोणु चराचरीं अधिक तो जो यादवांसीं पुरे ॥ १०५

आम्ही ना येत नायेतां जरि तुम्ही निक्षेपिलो आहवीं ।
आतां बुद्धि होये तरीचि बरवी गांवीं पडों आपुलां ।
पां कां हो मज चालतां मन उदो नाहीं आतां कैं वदो ।
वांचीजे जरि एक दाडु मरणां कोणां कहां नातळों ॥ १०६

आपूल्या मति बोलती एकमेकां होतील हाका हुका ।
शीघ्रें तेव्हेळि कृष्णराजु कटकामाजी रिगों आवे ।
तैंसेनी जरि वांचिजे तरि नेणो घाणा रिपूचा केला ।
वत्सू धेनुकु केशिया अघु देखा झूटपणें मारिला ॥ १०७

कर्मे बांधुनि सूदलो यदुपुढां कूडामती मारिलो ।
मातें नीगत वारिलें कुळस्त्रियां मी पापिया चालिलो ॥
पोटीं रीगुनि मायचां वरि क्षिती तेथौनिही काढिती ।
वैरीजाति गिवसुनीचि वधिती भ्रती तुम्हां लागली ॥ १०८

ऐसे बोलति भूपती गजबजां राजा शिशूपाळु तो ।
त्योंचे मागधु शाल्वुही चवकती पूर्व प्रतीती असे ॥

एतूला दळ पातलें जवळिके बीकें रणीं आंमुले।
देखौनी तेथ ऊचलूनि बगटें श्रीकृष्ण पांती नृपू।। १०९

तेथें दानव धूमकेतु रगडा माहापडीं मीति ना।
छत्रें वाघवडा हया पडवळा काठी टका झल्लरी।।
कूंचे प्राण किराण वैरि समरीं नीका पतांका वरी।
शस्त्रास्त्रीं अतिदारणी तळपतां कृतांतुही त्रासिपे।। ११०

हाथी मेघल भद्रजाति तुरंगीं चांगी रथी पायदां।
चातूरंग सुरंग चालत बळें मेळे त्रोजा आरणी।।
कोदंडी शर चित्रकीं भयंकरो तीरीं तृगेली धरी।
बीटी भेळक कापखंड समरीं दूरौनि जे मारिती।। १११

बाण प्राणविदीर्ण ॐडणगिरी खड्गें गदीं मुद्गलीं।
सूळीं साबळ सेलना सुलहुडी भूसुंडि चक्रादिकीं।।
कौंती मूशळ ईटिया तरुवरी काती कटारी सुरी।
फर्सी दीधळ गोफनी अरिघरी त्रोंबी दिशा गाजना।। ११२

दांडे त्रीसुळ चेंडु कोल परिघा व्याघ्रासिंहांचे दडे।
तैसे यादव दीसती उखरडे पूढेचि जे वाढती।।
पोटीं पाये नृपां दढांचि रिगती हाथीं मदू सांडिला।
लोहें धाकड झांपडीचि पडती तीव्रांगती यादवा।। ११३

तेथौनी प्रभु पातलातिजवळा रुक्मीणिये सांवळा।
गोपीनाथुखुणा सुदे ॐ सकळा दावी गुरुत्मा ध्वजीं।।
सैन्यू सुग्रिवु मेघपुष्पु तुरंगीं बाल्हाहाकादी रथीं।
हातीं चक्र पथीं वपू मरगजा दीशां किला फांकती।। ११४

हा देखै प्रभु चालतां स्थिरगती श्रीकृष्ण चक्रवती।
वामें रोहिणिनंदनू क्षितिपती एरीभुजे आहकू।।
आग्रें उद्धवु मागिलांकडे दिखा अर्जुन पाठीरखा।
देखैं देख सुरेश्वरां आवश्वरू नाहीं पती तूझेया।। ११५

रुक्मीणी करसंपुटीं निजपती जौहारिला श्रीपती ।
आर्ती घालित देखिली प्रभुरथीं हातीं धरी ब्राह्मणू ॥
लालुप्यें तुज नाठवे विचरितां लोकापवादुन्यथा ।
विप्रू बोलत सर्वथा जननिये हे हीन तूझी मती ॥ ११६

दैत्यां हिंसळु पातला यदुपती भेटी निघे भीमकू ।
लोकू नागरिकू सर्वे अरुहणें देखावया उत्सकू ॥
देखौनी प्रभु सांवळा उतवळा आलिंगिले पाये ते ।
जे श्रीउद्धव अर्जुनामृतधनी घालीत लोटांगणी ॥ ११७

ऊठौनियां यदुपती नृप पद्महस्तीं ।
आर्ती स्तुती करित वारित गोपिनाथू ॥
पूसे प्रदेशु कटका बरवा निका जो ।
सांघेबिंकापुर तेथें होये मेळिकारू ॥ ११८

रात्रीं प्रभु रुखवता परिचारिकांतें ।
धाडी सर्वे षडुरसीं रचलीं चतुर्द्धें ॥
कट्वाम्लतीक्ष्ण मधुरें लवणें कठोरें ।
ग्राह्यान्न चित्र रसना द्विज चोष्य भोग्यें ॥ ११९

आरोगिला यदुपती शरणागतींसीं ।
कर्पूरवासित जळें गुळला करूनी ॥
वीडा सुहेमतरुतत्सम पत्रिकांचा ।
देऊनि विप्रु निगतू नतु चक्रपाणी ॥ १२०

प्रसाददान भिमकी स्विकरी प्रभूचें ।
आणीत जें द्विजवरें परमादरें तें ॥
चिंतातुरा सखि पुसे निशि केवढी वो ।
यूगा घडी सम देखा मज जात आहे ॥ १२१

प्रौढेंद्रनीळशिबिरी प्रभु विद्रुमांचा ।
मांचा सुफेनपयसाम्यविचित्रशय्या ॥

श्रीउद्धवार्जुन बळा नृप उग्रसेना ।
पंचाननासदृश राम यदू समस्तां ॥ १२२

दैत्यां कुशांगम निशी रिपुलक्ष कोडी ।
पाळेगणी वडवडी मागधादिकांचा ।।
उन्निद्रजाग्रत भयातव वृष्णिधाकें ।
घोषे गर्जी घरटिया क्षपित क्षपेतें ॥ १२३

रुक्मीयें यदुशंकया गुढ गजां घालूनि दीशोदिशीं ।
मार्गी राजपथीं तुरंगम रथीं नीरूढि केली भली ॥
विश्वासू ह्मणें मानसीं तुम्ही धरा यां आतुरां यादवां ।
गोपाळां रणकर्कशां न पतिया भीया ह्मणें मारितां ॥ १२४

एतुलां निशिनिर्गमो जयतुरीं आत्राटिलीया पुरी ।
भेरी मंगळ गायनी परिकरीं मूरारि ऊपौढला ।।
रुक्मीणी रुषियोषितीं पतिव्रतीं न्हाणीयली सुवृतीं ।
सौंथी पूर्ण सुवर्णरत्नकळसीं विश्वासि जे मोहनी ।। १२५

वेटी क्षीरोदशेळा सुकृशकटितटीं मेखला क्षुद्रघंटीं ।
नूपूरें पादयुग्मीं रुणझणित नवीं वीरमुद्रांगुळीकी ।।
कंठीं मुक्ताफळी कीं मिरवत पदकीं ठीक चिंतामणीचें ।
कर्णी शोभा कपोलीं तळपत बरवा कुंडलें रत्नबद्धें ।। १२६

गोमेदी पैं सुरंगीं सरळ करयुगीं कांकणें पद्मरागीं ।
नूपूरें श्यामलांगीं ठक पडत जगीं मुद्रांगुळीविभागीं ।।
हातीं श्रीपद्ममाळा करित अवकळा चालतां राजहंसा ।
रुक्मीणीरुप पांतां मदनशरण्यथामूर्छिता लेख नाहीं ॥ १२७

खांडी लहुडी भुसंडी गळत करपुटीं दाटि नूठी नृपांची ।
पूटी सर्पी कटाक्षी प्रसित मदमर्दी अंबिकापूरमार्गी ।।
लीलावीलासभावी विदगद बरवी अंबिका पातली ते ।
पूजी सूधूपदीपीं अमृतरसरुपीं ऊन्दनीं तोषु पावी ।। १२८

ग्रं. क्र. ९५५६९

नारीकेळे सुकेळें गुळ्कर्दलिफळें जंबिरें मातुळींग ।
नारंगे वस्त्रलेणी ऋषिचेया वनिता वाण देऊनि भेटी ॥
पौरीं नानाप्रकारीं यतिनृपकुमरीं कृष्ण होकांबिके वो ।
सुकृती आमुचा तो प्रभु हरुनि नेवो रुक्मिणी रत्नबाळी ॥ १२९

सर्वांची बुद्धि एकी गिवसित भिमकी देवकीनंदनाते ।
पांतें ब्रह्मादिवृंदे हरिगिरिशपदें दाटली अंतराळीं ॥
कोडीनंता सुरेंद्रां ऋषिमुनिविबुधां विस्मयो कृष्णराजा ।
वैदर्भी विश्वबीजा दरुशणसमई माळ घालील कैसी ॥ १३०

चित वित वसुदेवानंदनू सर्वभावीं ।
प्रभु शरण म्हणौनी रुक्मिणी दृष्टि घाली ॥
सुरवरनिकरांसी देखता अंतराळी ।
प्रकटतु वनमाळी देखिला भीमकीया ॥ १३१

रथ कनकनिबद्धू शुद्धु जांबूनदाचा ।
ध्वजु रतनखचीतू वैनतासूत जेथें ॥
मणिगण घन संधी विद्रुमी बद्धवेदी ।
रविकरकिळ तेवी दारुकें प्रेरिला तो ॥ १३२

ठिकलग घटकोनी दिव्य सिंहासनी श्री—।
प्रभु मरगजकीळा पूतळा इंद्रनीळा ॥
रविशशिसम कर्णीं कुंडलें शुद्धवर्णीं ।
मिरवत पदकीं तो कौस्तुभू रत्नलानी ॥१३३

कटक करविभागीं दूसरा मुक्तरागीं ।
सरळकर सुरंगी मुद्रिका हस्तशाखीं ॥
नवकनकसुभासें पीतवस्त्रें परेशें ।
स्विकरूनि हृषिकेशें देखिले रुक्मिणीतें ॥१३४

घडघडितु रथेंसी पातला चक्रपाणी ।
करपुट रकुमीणो नीडळी ठेउनि वंदी ॥

स्विकरुनि कर हातीं वाइलो श्रीरथीं ते ।
कनककुमुदमाळा घातली कृष्णराजा ॥१३५

नवगुणशतलक्षी अंतराळीं विमानीं ।
सुरनिकर मिळूनी पांति ते वोहरातें ॥
जय नमु परशब्दीं पुष्पवृष्टी परशा ।
स्तविजतु परवाणी चक्रपाणी मुनींद्री ॥१३६

सुभरतमित जाणी नृत्य गंधर्व गाणी ।
गण समय सुवाणी चक्रपाणीसि पूढें ॥
हरिहर सुर सर्व पौर आनंदनादें ।
विनदत सुखशब्दें गर्जताती विमानीं ॥१३७

अति मधुर तुरनादीं दुंदुभीचां सुशब्दीं ।
पढिजातु चहुवेदीं मंत्रवादी स्वशाखी ॥
सुरपति अवलीळा पांत सर्वत्र डोळां ॥
निरतिशय सकळां थोर आनंद देतू ॥१३८

यदुविर बळभद्रू उद्धवू उग्रसेनू ।
गज रथ तुरंगौमू पार्थ दर्ष्टीसि पूढें ॥
सकळ सुख करूनी चालिला चक्रपाणी ।
थिरु थिरु विर वृष्णी चालती सर्व भारें ॥१३९

नभगत घनशद्वें सर्व वादित्रनादें ।
सचकित रिपुवृंदें पूसती काइ जालें ॥
प्रतिकुल कलिकाळू आंकणा शीशुपाळू ।
न लवित अतिवेळू नोवरी नेत वृष्णी ॥१४०

गजबज नृपकूळां मागधा शीशुपाळा ।
न गणित अवलीळा भीमकी नेत वृष्णी ॥
झडकरि रिपुमेळा मेळौनि चातुरंगें ।
गज रथ अतिवेगें चालिले दैत्य सर्वे ॥१४१

विदुरथ दमघोषू शाल्वु काशिश्वरु जो ।
मुर पिठु गणु बाणू पौंड्रिकू मागधेशू ।।
वसुमतिसुतु भौमू बल्बलू दंतवक्रू ।
झडपित यदुसैन्यें वेढीलीं सर्वदीशीं ।। १४२

घडघड रथवाटीं पातले हातपीटी ।
गिरिसम गज सृष्टी देत मीठी त्रिलोक्या ।।
यदुविर सुनि दृष्टी चालिले अश्वथाटीं ।
रगडत नरदाटी पाय दे क्रोधमूर्ती ।। १४३

बरवत बडिवारी घे घे जातील मारी ।
नवनिशित कुठारीं सिंथिती यादवातें ।।
वरिषत शरसूटी लोहदाटींतराळीं ।
नभ कवळित जाळीं पांजरा होत वृष्णी ।। १४४

थिरु थिरु बळि कृष्णा चांगु विरव्यातु वीरू ।
न वच न वच पारू बोलती मागधादी ।।
रकुमिणि हरितां कीं ठाउनाहीं त्रीलोकीं ।
त्यजिसि जरि भिमकी तरि राखौनि तूतें ।। १४५

वरि वळग मुरारी तीव्र देखौनि वैरी ।
निहुलचि परिवारीं खूण ऐसीचि केली ।।
तवं तवं दळभारा एत देखौनि शौरी ।
प्रकटत रिपु मारी दैत्य जंबूक सिंहू ।। १४६

मर्यादा जेवि लंघुनी जलनिधी ऊठावला भूतटीं ।
भूतग्रामचतुष्टयाप्रति मिठी देता नाही राखता ।।
तैसा यादवु सूटला आवाचिता कृत्तांत कोलाहळू ।
जैसा काळु महार्णवीं त्रिभुवना संहारितू उठला ।। १४७

क्षोभें रोहिणीनंदनू खवळला हा काळु दंडे जमू ।
तैसा मूशळ हातियेरु सरळा डोळां झळा सांडितू ।।

देखौनी तेथ मागधें म्हणितलें हा हो पळालेति तैं ।
पायांचें बळ चांग आति म्हणुनात्रे रणी रिगालेति पैं ॥ १४८

बोले राम जरासुता क्षणिक्षणी नीलज्जशीरोमणी ।
आक्षोणी तुज तेविसा धवधनी बाणी रणा झोडितां ॥
नीसूगा तुज बांधतां वेळवेळां दोरें दोरू आटला ।
वीएळा सिख लाविता नुभगसी जैसी मिसी नाटकी ॥ १४९

ब्रह्मांडीं करि कोपला भयंकरू जैसा महाभैरवू ।
तैसा उद्धवू चालिला अतिरथी शाल्वाप्रती बोलतू ॥
तूं रे वृष्णि जिणावया कुतपसीं घासीं धुळी ग्वादली ।
मूहूर्तीं तुज बात्तिसी लविनली शोभापती मां गळा ॥ १५०

सिंधूतें जेंवि घोंटुनी अतिबळू वडवाणळू ऊठला ।
तैसा अर्जुन पौंड्रिकावरि देखा कोपौनियां गर्जतू ॥
आधीची तुझे हातपाये वळल खोडांचि डुलाकुडा ।
गूढा वस्तु विमत्सरा तुज मुढा खोडा जितां पातला ॥ १५१

जैसें कां विष सागरीं निफनले जाळीत दाही दिशा ।
तेथें रुद्र महासिंहु प्रकटला हा उग्रसेनु तैसा ॥
भौमाते म्हणे काय रे तुज सदा गाइ कुवारी नुरे ।
शौरेभूतकृतांतातुजीवकुरुठा धीटा तुझें पूरलें ॥ १५२

बाणातें म्हणे सात्यकी परि निकी तुझी सदा आइकों ।
गोसांवीं गुरु आंकना कऱ्हणाहीं घालीत पैं न देखें ॥
ऐसा गर्वकुळाचळासि चढला आला ससा भाणसा ।
तैसा तूं मज सन्मुखू जरि आतां वैवस्वता भेटसी ॥ १५३

ऐसे युध्यमहार्णवीं एकमेकां निष्ठूर ते रूठले ।
वर्मोद्घात सुनीट वज्र तुमळीं तोडीतची पातले ॥
एकां हाति कटारिया सबखंडी केसी धरूनी घसे ।
पीळीतां कर मोडितां उपडितां जिह्वा रणी मातले ॥ १५४

अनुक्रम ८५९६१ दि: ८।०५
ग्रंथांक २०७९ नों दि: २२।३।८०



खांडां तोडित फोडितातिं उदरें मारें नुरे आंतकू ।
शीसीं चेंडुफळी करूनि कवळी हातां तळीं वाकुडा ॥
दूतोंडी साडि जाजरे म्हणुनिया फोडीति पाटां धडे ।
दांडे मस्तकिं वाजतां ठिकरिया होतातिं हाडें धडें ॥ १९५

तेथ सूळगडे करीत रगडे कातीं धडें तूटतें ।
पोटें फाटत जांधवा निवटतां बाऱ्हाट चौंहीकडे ॥
सूळीं पोवत वाटतातिं तुमळीं ते चक्रवाटींतळीं ।
कोल्हाळीं तेथ कादितां चळबळी अंत्रावळी गुंफतीं ॥ १९६

दैत्यां काळु कराळ यादव रणीं वीशाणले मारितां ।
आपूले पर नेणतां रिपुकुळीं वृष्णीवरी वाईले ॥
कोल्हाळी तेथ किंकळी बळबळी हाका हुका बोंबटा ।
घे घे जातिल यादव अरबटां धंटा भटां त्रासका ॥ १९७

ऐसे दैत्य कुळाचळादळ रणीं झोंबिनले आरणी ।
तेथें यादववज्रपाणि धरणीं बाणीं एते पोविले ॥
न लोटे दळ पर्वतीसम तेथें भीयालि ते रुक्मिणीं ।
देखौनी प्रभु चक्रपाणीं म्हणतू ना भी तुझे जिंकतीं ॥ १९८

ऐसें बोलुनि कृष्णराजें समरीं सारंगटंकारुवें ।
सिंधीले रिपु आधवे अदळ जे पाडीत भूमंडळी ॥
जैसें ब्रह्मकटाह सर्पगरळें फूत्कारमात्रें जळें ।
गोपाळें शरवृष्टिदारु बळें काळें रणीं कासिलें ॥ १९९

तोडीले शिर बाहु जानुयुगुळीं फोडीयले भूतळीं ।
मोडाले धिर वीर जे रिपुदळीं वाटीयले मूसळीं ॥
खाळीले रथसारथी भुजबळीं हाथीं दळीं पोविले ।
झोडीले हय राउतीं रगडितां देखौनि भंगाणले ॥ १६०

गेलें रे दळ मोडलें अरबटां वाटां भटां आति ना ।
राने डोंगर लंधितातिं सइरा धायेवारां भूलले ॥

केंसीं मोकळ पोकळां परिवटीं वाटे तरु देखतां ।
आले यादव देखुनीचि सळ्तां धोंडीचि हाथीं तया ॥ १६१

ऐसें तें दळ मोडले तवं पुरी वार्ताकरी पातले ।
राया सांघति भीमका जि कटकामाजी जें जें वर्तलें ॥
शाल्वादी रिपु मोर्डाले यदुपती खांखाति भूतावळी ।
मांसाचे गिरि ऊकळी रुधिर जी आजी पळे तो चुके ॥ १६२

जरासुतू शस्त्रहतू पळाला ।
सर्वेचि शाल्वा सिरव लाविली पैं ॥
भौमासुरू आतुरु जात वेगें ।
न पाय मागें रणभूमि डोळा ॥ १६३

विदूरथू वीरथु चक्रपाणी ।
करूनि बाणीं दळ भंगिलें पैं ॥
दैत्या त्रिटंकू अरि पौंड्रिकू जो ।
मडेंमिषें निश्चळु तेथ राहे ॥ १६४

बाणासुरु गजदळीं कळि मोडला तो ।
गेला पळौनि सहितू सख बल्बलेंसीं ॥
कलिंगु चांगु पळतू हतु वासुदेवें ।
काशीश्वरू सवें सवें पळतू मुरेंसीं ॥ १६५

वऱ्हाडिके हरिषितु रतु उत्सवेंसीं ।
आला सुतासि लगिना दमघोषु राजा ॥
त्या वाढिलें यदुपती प्रचुरीं स्वहस्तीं ।
पांती बहूत उठविते चतुरंग सेना ॥ १६६

वार्त्तिकां तेथ बोलता रुकुमिया ऊठावला अद्भुतू ।
डोळां आगि वमीतुची मग म्हणे वृष्णीसि जीणें आतां ॥
आक्षोणी दळ संवृतू त्वरितु तो चाले महा मत्सरीं ।
बोली तीव्रु उत्कुंठु भीमकुमरू देखौनिया गर्जतू ॥ १६७

गोपाळा तुज वोहरें विघडितां स्वेच्छासर्से वर्ततां ।
सृष्टीमाजि सदा तुतें नियमितां नाही भयो सर्वथा ॥
तो तूं पै मज सन्मुख जरि आतां जालासि वैत्रस्त्रता ।
सांडी रुक्मिणि काइसी तुज कथा वीजातिया गौळीया ॥ १६८

नोकीतू तेथ हांकितू शरसुटी काळा मिठी भेलकी ।
आहाले हयसारथी ध्वजु रथी श्रीकृष्ण कोपे तया ॥
सातै बाण सुवूर्ण वाटुनि भले केलेवलीला प्रभू ।
सोळा बाण सुतीक्ष्ण काळझडपी ते अर्पिले साळकीं ॥ १६९

तोडीला ध्वजु सारथी धनु रथी घोडे ध्वजी एककें ।
चक्रें रक्षक तोडिले तेथ देखा आक्षोणि वीरांउर्षी ॥
क्रोधें तीखटु टाकुनी अरबटू आला सुर्नाटू भला ।
बोलौनी आत उत्कंठु रकुकिया कृष्णा निडें पातला ॥ १७०

पाचारी तुज राखणी पशुवनीं कां झोंबणें गौळणी ।
लोर्णा ताक वना तेणें धवधनी त्या नोवरी रुक्मिणा ॥
गोपाळा तुज भीमकी मुळवणी जाणै आतां पातली ।
टाकूनी तेथ कृष्णराये धरुनी रथावरी घातला ॥ १७१

टाटावीला ध्वजेसीं मग धरुनि असी वोडिली एकि मीसी ।
डोयेसी पांच वाटा म्हणतु अरबटा एकू लाठाचि तूं रे ॥
राउतै तूज साजे म्हणउनि सहजें आलासि प्रौढि दाऊं ।
भाऊ रुक्मीणियेचा तरि तुज येथिचा सूंकिचा उग्घु दील्हा ॥ १७२

आम्ही गोपाळ फूडे तुम्हि तवं उघडे राजपुत्रा वरिष्ट ।
निष्टा तूझी निकी रे म्हणउनि निकरें अर्द्ध क्षौरें पुरेता ॥
जिव्हेचीया अटेटा वडबड कुरुठा जीभटा जीभ तूझी ।
उन्मळावी सकंदीं तवं मिवुनि पदीं लागली रुक्मिणी ते ॥ १७३

रामें कोपौनि कृष्णा रकुमिणि बरवा वाक्य सिद्धार्थशब्दीं ।
भेटी वैल्कव्य चीतीं मग त्रिदशपती सोडिला भीमपुत्रू ॥

नाना विघ्ना विनाशू करुनि सुरशू चालिला द्वारकेसी ।
श्रीकृष्णा पुष्पवर्षे सुर करित सुखें संतोषें पूर्ण सर्वै ।। १७४

एरीकडे नोवरदेऊ दीसे ।
डाउवासि रुसे त्याजि कांकणातें ।।
बासींग तोडी वरदेसि बूडी ।
देऊनि फडी हळदी त्वचेची ।। १७५

चैद्यू दुःखी बुडाला पळउनि वहिला मागधू तेथ आला ।
संबोखीला सुनीती परियस नृपती काळाची स्थीति ऐसी ॥
वीचारें दुःख सांडी सुखसमयघडी पाहिल जेव्हेळी तूं ।
जीणै वृष्णी सुरातें म्हणउनि त्वरितें नीगाला मागधेशू ॥ १७६

रामें महावदेवी परिकर बरवी ऊज केली सुशोभा ।
वैदर्भा मूळ धाडी सकल गुडगडी द्वारके वृष्णियात्रा ।।
देवां दैत्यां मुनींद्रा रिषिमुनिविबुधां चांग सन्मान केला ।
श्रीकृष्णा रुक्मिणीये सुलगिन बरवें लाविलें व्यासगर्गी ॥ १७७

उत्साहो पैं त्रिलोक्या जग परमसुखामाजि वेल्हात देखा ।
रत्नेलंकारलेणा कनकमणिगणा मीति ना वस्त्रदाना ।।
पाची मुक्ते सुनीळें सुभरित सकळें पाटवीली परेशें ।
श्रीकृष्ण द्वारकेसीं प्रविशत्व कळसीं रत्न पीयूषपूर्णा ।। १७८

सुशुभित यदुपूरी गोपुरीं दिव्य शोभा ।
कनककमळ सैंभा पाचबद्धा सुभूमी ।।
मखर शुभपताका गूढिया चित्र वस्त्रें ।
सकळ गृहें पवित्रें शेषही वर्णु नेणें ।। १७९

ग्रहगणसम टीका रत्नालेखा अपारा ।
बहु मुगुत सुहीरा शोभताती वितानी ।।
यदुगृहशुभभिंती सोमकांती निबद्धा ।
प्रकटत समशुद्धा मंदिरा माणिकूळीं ।। १८०

खणि खणि दिपमाळा विद्रुमी पट्टिशाळा ।
झळफळित सुढाळा पूतळीया सुताला ॥
हरिभुवनि विशाळा पत्रवल्ली सुकीळा ।
निरसत समडोळा रात्रिदीवसमानें ॥ १८१

हरिहर निकरांची रूपडी चेतनें पैं ।
त्रिभुवन लवलाहें येत पाहो प्रभूतें ॥
रुकमिणि हरि दोघे मदिरांतु प्रवेशे ।
ऋषिमुनि सरिसे पैं शांतिपाठीं स्तवीती ॥ १८२

तेथें श्रीचक्रपाणी निकट रुक्मिणी आसनी पेरोजांचां ।
पाठीं गोमेदहीरेखचितपरिकरें बैसले श्रीमुरारी ॥
पट्टाभीषेख गर्गे करूनि शुभ जलें आक्षवाणी स्वसूक्तीं ।
वोवाळीतां प्रभूतें रुकमिणिसहितें वंदिती देववृंदें ॥ १८३

श्रीकृष्णें भीमकाया वसुदेव नमिला देवकी राम वृंदें ।
लोकोक्ती मान दील्हा सुरपति पहिला सोहळा इंद्रलोकीं ॥
पाताळीं मृत्यलोकीं पढिजत कटकीं दैत्य पै कीं अपारे ।
अंतौरें वैरियांची रकुमिणिहरणीं गाति चक्रेश्वरातें ॥ १८४

कृष्णाचा घायवारा रिपु पळत पुरा येउनी तेथ तेहीं ।
डांगूरा फोकरीला प्रवदत कुहरामाजि घाला स्त्रियांतें ॥
आपूलांयासि आतां सुजतन करितां यादवा आड ठांता ।
नाहा कोण्हासि सत्ता म्हणुनि लपवितां जीणिजे पैं त्रिशुद्धी ॥ १८५

ब्रह्मांडा घडमोडिकारक परा आतूर वैरांतका ।
काळादीकानियामका सुरसखा विद्यामृतोदायका ॥
नानामार्गात्रिसर्गशास्त्ररहिता श्रीचक्रपाणी आतां ।
साष्टांगीं प्रणिपात देवकीसुता श्रीकृष्णराया नम: ॥ १८६

× × ×

सत्राजीतें प्रसेना मणि लेउनि वना चालिला तेथ सिंहें ।
मारीला जांबवंते सिंह्व वधुनि सुते अर्पि श्रीमंतकातें ॥

तेथें चाले मुरारी जिणउनि कुहरी जांबुवंतु स्वकन्या।
अर्पी श्रीमंतकेसी अपयश विशसी जांबवंती प्रणूनी॥ १८७

सत्राजीतें विशाळें अपयशकमळें वाइली गोपिनाथा।
तेणें सत्राजितासी सकल यदुकुळी देत गाळी अपारा॥
तेणें तापेनुतप्पू वसुदेवोसुतू प्रार्थुनी सत्यभामा।
देतो श्रीमंतकेसी दुःकृत लिहि पुसी पायराशीविनाशू॥ १८८

सौंदर्या नग्नजीती नृप धरुनि चितीं कौशला एत सर्वे।
संकेतीं सैंवराचा मरत क्षितिपती सप्तवृषाहती जे॥
तेथें आला मुरारी सपत वृष धरी एकला श्रीकरीं तो।
माळार्पी नग्नजीती यदुपति नृपती देत आनंदनातें॥ १८९

भग्नी विंदानुविंदा गिवसित वसुधा रत्नसू मित्रविंदा।
गोविंदा माळ घाली सकल रिपुकुळी झोडिले पैं अवत्यें॥
दूतोंडी सूनि तोंडी सकटाचि लहुडी मारिले दैत्य भीडी।
पिंडीं खांडा दुफोडी करित निजगडी पातला कृष्णराजा॥ १९०

राधायत्रें दुआडें अतुल बळ अडे भूपकौसाल्य कूडे।
वेडे पार्थादि जेथ दृयदकृत तेथें थोवडें कोडि गूणा॥
भेदीतां तें श्रीकृष्णा प्रकट ततक्षणा लक्ष्मणा माळ घाली।
दैत्यांसी सूनि धाटा निगत जगजेठा द्वारके यादवांसीं॥ १९१

भद्रा श्रीमत बाळी प्रकटत भुतळीं सांवळी कृष्णचिंता।
श्रीमंता माळ घाली मनमथकवळी भूप जाळीत सर्वे॥
कालींद्री सूर्यकन्या तप करित वना कृष्ण आलार्जुनेसीं।
तेजें सौंदर्यराशी वसुदेवसुतासीं वेल्हाळा माळ घाली॥ १९२

प्राग्ज्योतीषा दुआडा अवघड अगडा सात भेदूनि कृष्णें।
मूराशीरासि झोडी पिठु वधुनि खुडी प्राण भौमासुराचे॥
सोळा सहस्र नारी आणिक सतभरी भौममंदीरीं होती।
एकीं देखै महूर्नीं प्रणुनि श्रीपती देवर्षि भ्रांति जेथें॥ १९३

सौंदर्योलिखमात्रें रकुमिणिकलहीं प्रेम वृद्धीसि आलें ।
कामासी जन्म जेथें रतिकपटपथें सांबरातें वधीतो ॥
तेथेनीरुद्धजन्मे उपचय कुसुमे पारिजात स्वदासी ।
देखौनी सत्यभामे परवच विमने दात्रि प्रीतिप्रतीती ॥ १९४

स्वप्नीचा चित्ररेषा वरु नेउनि उषा भुंजका कृष्णपौत्रा ।
बाणा संग्राम दोघां कवळुनि आवघां बांधला नागपाशीं ॥
सोडी श्रोणीतपूरी यदुसहित हरी एउनि जंभनास्त्रें ।
मोहीलें पैं हरातें सनवनवशतें तोडिले हात बाणा ॥१९५

काष्टाचे हात दोन्ही सुगरुड करुनी पौंड्रकू दूत धाडी ।
सांडी तूं नांव माझें तुज काहिं न सजे वासुदेवादि नामें ॥
नेघें चक्रादि हातीं एऊनि मजप्रती वैजयंती दयावी ।
कौस्तूभादीक चिन्हें त्याजुनि अस मणे नातरी चाल वेगें ॥ १९६

हांसौनी कृष्णराजें झडकरित बिजें तेथ केलें यदूसी ।
काष्टासी वेंश घेउनी विकट वपु धरुनी पौंड्रिकू तेथ आला ॥
वृष्णी हांसोनि पांती प्रभुस सदृश प्रती ऊडवीली विकटे ।
बीकें तीक्षण प्रहारीं शिर हरुनि हरी दूजें काशीश्वराचें ॥ १९७

काशीये शीर पाडी देखउनि रगडी भूतमासी प्रचंडी ।
श्रीशैले अग्नकुंडी हवन करि कुंडी मंत्र नग्नु त्रिकोनी ॥
सूदर्क्षीणे सुकृत्या निफजउनि पुरा द्वारके पाठवीली ।
चक्रा **भीउनी** कैसी सुदक्षिणुचि ग्रसी जाळि वाराणसीते ॥ १९८

हस्तानापूर शौरी उलथुनि जमुनें घालितां नागरें तैं ।
सांबूतें स्त्रीसहीतां सुमन करुनी संपादी कौरवेशूर ॥
बिप्रा धर्मा विनाशी अघरुप असुरू बलबलू मारिला पैं ।
रासक्रीडेसि वृंदा वधु करुनि सदा वेधि साजात्य रामू ॥ १९९

धर्में श्रीकृष्णराजा कृतुपति करुणी मूळ धडूनि मूनी ।
एऊनी राजदूतें निजपति त्वरितें उद्धवोक्तें निगाला ॥

हस्तीनापूर पावे झडकरि अघवे खेंव देती परेशा ।
धर्में बोलौनि आर्ती दिगविजकृती नूल्हाटे मागधेशू ।। २००

श्रीकृष्णू भीमसेनू द्विजवपु धरुनू अर्जुनु चालिला ते ।
गीरीव्रजासि तीन्ही उपनिषदध्वनी आइके मागधेशू ।।
विप्राची कोडि एकी म्हणउनि हरिषीं भीतरी हाकरी तो ।
तेयातें देखउनी मग म्हणत मनी आम्हां हे दृष्टपूर्वी ।। २०१

तींघै याचीत रावो नलगत खेऊ मागती जुंझ दे तूं ।
जाणै हा भीमसेनू आणिक अर्जुनु मी कृष्णू वैरी तूझा ।।
तेव्हां हांसोनी बोले रणि पळसि भलें म्हणौनि तूसीं न जुंझे ।
अर्जुनू धाकुटें हें मजसदृश होये भीमसेनूचि एकू ॥ २०२

क्रोधें पूरासि बाह्ये सम रिगत खळा दोघे सेला समाना ।
हातीं कार्ष्णायशाच्या करी कदन गदा घातींपातीं ढिझाळे ।।
देहे वज्रसमानें आहनत गहने साननी मेरु फूटे ।
लोहें होताति कूटें झणे झणे उतटे डांक भूगोळकाचें ।। २०३

भीमा बाहद्रथा पैं न विघडत कहीं लोह गेले समाप्ती ।
हाथीची मुष्टीघातीं उलथत भ्रमती भीडतां मल्लविद्या ।।
हाका हाकीत लाठे मिरि तडकु फुटे हाणताती लल्हाटें ।
नीटें आटीत आंगें निहटत आवेघ वेगें विंदाणिताती ॥ २०४

तावीती उग्रदृष्टी बिघडत विकटी पीळनीं नोट दोन्ही ।
नावेक भीमसेनी श्रमु अनुजमनी देखुनि अर्जुनातें ॥
दावी भीमासि खूणा करकृत शिळिका चीरुनी कृष्णराणा ।
देखौनीया सिहाणा करु पिटुनि खुणा पातला मागधासी ।। २०५

देवाची द्दष्ट भीमा एरु चढत तमा घाऊ देऊनि थोरू ।
भीमें झोबौनि ऊरु बृहद्रथकुमरु पाडिला भूतटीं तो ।।
पायेंचा पाऊ दाटी धरुनि करपुटीं ऊतटी एकु पाऊ ।
राऊ फाडौनि दोन्ही सम सकळ जनीं साम्य सांडूनि घाली ।।२०६

हाहाकारु हिताशां साहदेवो त्वरिता एउनी आड घाली।
थापूनी कृष्णराजें झडकरित बिजें केलें आर्तांसिपासी ॥
रायें बांदौडि मुक्ते निज करुनि शतें आठ सहस्रवीसां।
सर्वेशाज्ञें निगालें हरि करुनि भलें आले धर्मासि भेटी ॥ २०७

क्रतुपति करुनीयां अग्रपूजा विचारी।
रिषि मुनि सुनिहारी व्यासपुत्रूचि आला ॥
वयु न वरपुजा हें बोलतू शूक सर्वां।
वसुदेवसुतु जीवां ज्ञानियां बापु जाणा ॥ २०८

रिषिमुनि यदुदेवीं पीटिली एक टाळी।
झडकरि वनमाळी हाकरी धर्मराजा ॥
कनककरसुपात्रीं वाढितां पायसां तैं।
निजपति यमसूतें पूजिला अग्रपूजें ॥ २०९

रतनखचित झारी घे करीं द्रुपदी श्री–।
चरणकमळ धर्मा क्षालितां हेमपात्री ॥
दमघोषसुत आला देत गाळी मुरारी।
झडकरि शिर शौरी तोडिलें चैद्यराजा ॥ २१०

दमघोषसुतपिंडीं तेज उल्हीत कोडी।
रविकिळ रिषिवृंदीं देखिले श्रीपदांब्जीं ॥
विलसत हृषिकेशी यज्ञु धर्मासि पूर्णू।
सुकरुनि पर कृष्णू चालिला द्वारकेसी ॥ २११

शाल्वे वृष्णीजिगीषां अनुदिनि तपतां मुष्टि धूलिचि खाये।
तोषौनीयां महेशें यदु जिनसि ऐसें दीधलें वत्सरासी ॥
सूनी पाहूनि खांडी यदुनगरगडी येउनी घालि धाडी।
आकासी हाक फोडी त्वरित गडबडी हलकालोळ सर्वां ॥ २१२

कोडी छपन्न वृष्णी निगत ततक्षणीं मुख्य प्रद्युम्न तयां।
देखौनी शाल्वु शोभीं घडघडित नभीं विंधला बाणत्रैर्हीं ॥

सेलीताति त्रिशूळीं कवळित कवळीं किंकिळी हांकिताती।
पांति प्रौढी यदूची खिळिजत कवचीं शाल्व धूनीत माथें ।। २१३

नूपूरीजे सुधर्में म्हणउनि अघवे हारपौनीचि गेले ।
वृष्णी आश्चर्य तेथें न देखति दल ते मायावी शाल्वु जाणा ।।
तारुवें लक्ष कोडी जळचर उघडी सागरीं देखीयलीं ।
वैरी सिंधूणि वृष्णी तवं दिसत खणी पाठारीं पर्वताचा ।। २१४

तेथें संधान शस्त्रीं करुनि अवचिती दीसती अंतराळी ।
तेणेची भूतळीं पैं न दिसत कवळी अंधकारू यदूतें ।।
डोळा कांहीं न दीसे तंव वर्षत शिसें पावुसीं सोंडवाऱ्ही ।
भारी मांसी कबंधी प्रभु पिडित पुरी रुधिरी वर्षधारी ।। २१५

शीला धोंडी प्रचंडी तरु गिरिजसडा सांगडा ऊपमाना ।
प्रद्युम्ना कोपु आला न धरितु वहिला मायावीयांसि राउ ।।
माया नाशूनि गाढा तवं येरु उघडा देखुनी शस्त्रघातीं ।
शाल्वे कोपौनि हातीं हरिसुतु त्वरितीं हाणुनी हाक दिल्ही ।। २१६

मूर्च्छा प्रद्युम्न पांती रथु निनि त्वरिती सारथी धर्मवेत्ता ।
चिंता प्रद्युम्नु बोले रणउनि निणिलें मातें हे कूड तूझें ।।
बोले सूतू विचारी अनुचित न करी धर्मुवांचूनि नीती ।
आतां शाल्वाप्रती ने मग रथु झडती शोभेंसी सूत टेंकी ।। २१७

दापातीया गदांकीं आहणुनि तवकीं पाडिला शाल्वु शोभी ।
क्षोभें थोकौनि गेला न देखति कन्हणे तत्क्षणीं देखिला तो ।।
तेरा दी मारु थोरु वसुदेवकुमरू पूसतू कुंतियेतें ।
गांवीं उत्पात वीरां म्हणउनि नगरा वैनतेयासि चाले ।। २१८

प्रद्युम्नादि प्रभूतें देखउनि हरिषें सूखिये वृष्णि जाले ।
शाल्वे देखौनि ऊजू यदु त्यजुनि अजू टाकि शोभें विशाळें ।।
गोसावी तेथ शोभावरि खिळुनि उभा बाणवाऱ्हीं तृशाणी ।
एरें त्रीशूळ पाणीं घेउनि ततक्षणी कोपें हाला गुरुत्मा ।। २१९

एतें त्रीशूळ तोडी न लगतचि घडी देखुनी शस्त्र कोडी।
घाली ढोंढी प्रचंडी रगडित लहुडी दूतोंडी चक्रपाणी॥
कुन्हाडीं कूट केली रिपुदळें वहिली घेतली कांडवाऱ्ही।
रूधीरीं वर्षधारीं झळंबत समरीं केसु गीरीसि जैसे॥ २२०

शाल्वें देखौनि ऐसें धरूनि विररसें जे गदा देवमारी।
घालूनीयां मुरारी निहटत श्रीकरीं पाडि सारंगभूमीं॥
दैत्या आनंद थोरू यदुसुरनिकरू खोचला चित्तकानीं।
देखे सारंगपाणी युगसम करणी तो देवो कोपला रे॥ २२१

जैसे पर्वत वज्रापाणि रगडी कां सिंहु कोडी गजा।
तैसा कृष्ण निजायुधीं रगडितू वीरांतकू एकला॥
घाये मारित पारकीं कंवतिकीं कौमोदकी वांवेर।
खड्गू नंदक घेउनी सिख तया लावीत विश्वांतका॥ २२२

ऐसा कृष्ण विशाणला तव मही शाल्वूचि नाही रणीं।
तेथें यादव चक्रपाणि नमिती यामद्वयांतीं तदा॥
माता देवकि देखती वसुदेवो बांधौनिया आणिला।
आलापी तेथ देवकी प्रभुपुढें दुःखीत आर्ती म्हणे॥ २२३

कृष्णा शाल्वे तुझा पैं वसुदेव जनकू बांधुनी आणिलासे।
कैसें आम्हासि जालें कटकट वहिलें सोडवी कां सुपुत्रा॥
म्लानी देखौनि कृष्णें नटु धरुनि म्हणें ॐ खटें आजि जालें।
आम्हा पूढांचि देखा निज जनकु सखा बांधला काइ कीजे॥ २२४

ऐसें बोलौनि कृष्णें तव नवल क्षणें देवकी तेथ नाहीं।
नाहीं पीता मुरारी देखउनि श्रीहरी वैरि शोभीचि देखें॥
रोखें संधान नेटें करुनि शतकुटें सागरीं शोभ पाडी।
एरां खांचूनि धाडी झडकरित खुडी शीर शाल्वा विराचें॥ २२५

संग्रामीं नीट वैरी कुट करुनि हरी दंतवक्रूहि मारी।
तेजोराशी मुरारी विलसत अमरी देखिला पादपद्मीं॥

शीशूपाळू कळिंगू जय विजय पदीं स्थापिले कृष्णराजें ।
शापें ते दैत्ययोनीपतित सुभवनीं वैकुंठीं बैसवीले ।। २२६

संग्रामी थोरु हातू अरिदळ निहतू दिग्गजा काळु मूर्त्तु ।
कृतांतू मारिला तो विदुरथु धरणीभारु उन्मूलिला तै ।।
मूहूर्तीं पूतनादी विदुथु जइ वधीं सेवटू सर्व दैत्या ।
नाही वैरी धरेसी नृप सकळ वशी उग्रसेनासि केलें ॥ २२७

गुरुसुत मृतदानी दक्षिण स्वार्जुनी दे ।
सख नृप कुरुवीरा धीर क्षीराब्धिजातें ।।
विपरितितिथिकारी ब्रह्मचर्याष्ट शौरी ।
वयन सुतमहारी उद्धवा दे मुरारी ।। २२८

पीडीला पुत्रशोकें द्विज यदु असिकें शापितां अर्जुनू तैं ।
पैजा घे पुत्रदानीं दशसुतमरणीं अग्नि घालीत कृष्णें ।।
नीषेधूनि क्षिराब्धी गत परमाविधी पूजिला लोकपाळें ।
लक्ष्मी आनंदमेळे सुतृपित सकळे कृष्ण बाळें द्विजा दे ॥ २२९

गोपीतापप्रहाराश्रय नमितकरा सुंदरा चक्रपाणी ।
अर्जूना ज्ञानदानी द्वयसुत पवनी नारदा दर्पहानी ।।
अर्जूनाग्निप्रतिज्ञा जयद्रथहरणा देवकीपुत्रदाना ।
विज्ञानेशा श्रीकृष्णा जळचर जमुना वेधदा त्राहे मातें ॥ २३०

कृष्णाराया चरित्रें सुमन करधृतें वैरिया तीक्ष्ण शस्त्रें ।
कामक्रोधादिकांतें निरसुनि परतें जीवत्वादीक नाशी ॥
ऊपेगांतीं विचिंती त्वरित निजपती निश्चिती वासु मांडी ।
म्हणौनी संकीर्तिली पै विहिनु मति रही चक्रेशा त्राहि मातें ॥ २३१

लीलावशें ऋषिकुळीं ऋषिवेषधारी ।
दत्तात्रयोभयविलोकतया विहारी ॥
व्यावर्त्तनैकशुभकार्य परावतारी ।
जो दर्शने सुफलता नर सृष्टि कारी ॥ २३२

धूपायनें करकृतें सहसार्जुना जो ।
दाता वरासि धरणीवलयाधिपत्वीं ॥
सेवा प्रकृष्टकरणी पर तोषला तो ।
दत्तात्रयो विविधवेध सुरादि राजा ॥ २३३

मादालसातनयतापकुळांतकू जो ।
भौतां स्वदैवकृत वाकूत्रय बाणघाती ॥
मायां त्यजू पिशित कावडिभार वाहे ।
डोलायमान बटुता चरणेशु चाले ॥ २३४

जो रेणुकांतुक रणी फरसाभिरामू ।
आचार्यकार्य जडचेतनलक्ष बोले ॥
अंत्यस्थिता विनवणी न करी परात्मा ।
स्त्री वीनवी मग मनोरथ पूरवी जो ॥ २३५

द्वीधे नटे पर दयाकरणी दयाळू ।
कारुण्यसिंधु पतितोंद्धरणी कृपाळू ॥
नाना विचित्र वपु वेष धरूनि खेळे ।
काळे चतुर्युगबळें कुहकेश्वरू जो ॥ २३६

नाना लीळा करित कमळासदृशी दृष्टि पार्ती ।
जीवां आर्त्ती हरितु नगरी द्वारके चक्रपाणी ॥
हातीं सूर्पी सुरजनि करी तो भरी पांशु वीथी ।
गोमत्यांत क्षपित परमू सर्व विश्रामु भूतां ॥ २३७

देखा दूजी सम वपु अजी क्रीडतां देखिजेना ।
निष्ठा दानी सकळचि मनी एकु वांचूनि नाही ॥
दूजे पांता नवलचि कथा ऊर्द्धरेता परेशू ।
कैसा देखा व्रतधर सखा वेष विश्रामु जेथें ॥ २३८

काळा मूर्ता भवभयहता शेवटू पापराशी ।
तयासीची भयहरकरू क्षेम दातारु देता ॥

जो कां शांता सकळचि करितां मंत्रजातापरोक्षे ।
त्रिघेधीना रजतमहिना बावना सिद्धि देती ।। २३९

सूर्ये दूजी हत वपु अजी दानि जो शुद्धदृष्टी ।
सृष्टी दूजा भवभयगजा मारकू सिंहु नाही ।।
डोळा कामू त्रिगतभ्रमू तेबलायाचितांही ।
निर्वाळाही करितु सरिता गोमतीतीरगुंफे ।। २४०

आश्चर्यातें करितु नगरी द्वारका पूरि देखा ।
जो सूरेखा नरपरुसुखामाजि मूर्ती त्रिभेदी ।।
पादांकीता कवतुलरता निश्चिता वेधमूर्ती ।
नाना कीर्ती पर निजरती आर्तिदानी नमोस्तू ।। २४१

बहुतचि मति खेळा रिद्धपूरस्थ बाला ।
परमसुखजिव्हाळा देत मेळा पदांचा ।।
कृमि परपद पावी सूचिके होक्य दावी ।
निचनिचची सुहावी गुंडमू केळि खेळे ।। २४२

विहरतु सुकुमारे सुंदरे पादपद्मे ।
चुळकृत घटनीरे तो भरी श्रीकरें पैं ।।
उतरुनि अनुमानी भांडि रेऊनि पाए ।
चवकत लवलाहे भे नटी सर्पशब्दे ।। २४३

सुरवरवनितातें हस्तदीपप्रकाशीं ।
निशि विचरत कैसी गुंडमेसी सुशोभा ।।
विगुण वयु नटावी आंगुळी व्योमु दावी ।
वरजन पर पावी गुंडमू स्वामि माझा ।। २४४

अवरचि धृत पृष्ठी वेधदृष्टी परेशा ।
विवदतु निजभाषा श्रीनिवासासि विस्मो ।।
कवतुल नरलोका तालिका वातु हांसे ।
मुखकमळ विकासे देवतानंदपूर्णा ।। २४५

मळकुळनृपबीजा ध्वंसद्दक गुंडमेशा ।
विमल कुळनिवासा स्वात्मरामा प्रकाशा ।।
सुरवरनिकराज्ञा निःप्रपंचाततज्ञा ।
गुरु परतरवेषा गोप्यभाषा नतोस्मि ॥२४६

लोकाधीशेश्यसेव्या वपु विधृत परें नागरें चक्रपाणी ।
आर्या लानी सुलीळा विचरत सकला भूतलामाजि राउ ॥
नेणीजे जो अनादी रिषिमुनिविबुधी वेदशास्त्रप्रभेदी ।
वाचा त्रैग्युक्तवादीं सुरपति विविधीं बोधि ज्ञानीं अनंती ।। २४७

कामादी पर्वतातें शतकुट करिते वज्र वीचारहातें ।
नाथें तेणें सुवेषें विहरण करितां बोधि आर्ता प्रतिष्ठा ॥
केली लावण्यसिंधू प्रकटत विविधू चौरसू मार्गबोधू ।
देऊनी वेधु संतां त्रिकुटकुटकथा नाहि देहीं कहीची ॥ २४८

हा एकू गूणगूणी चतुसमय खुणी भाषणी कोडिवान्ही ।
एकासीतिप्रकारीं सुख सगुणपरी शेखरीं दासु जाणे ॥
मध्ये लक्ष प्रकाशीं सुरसहित कशीं पंचविंशी सुतत्वीं ।
साहासीं सप्तजाती द्वयरहित कृती जीवजाती निषेवी ।। २४९

ब्रह्मांडा लेख नाही नृपकृत परही व्यर्थ नीरूपिती नां ।
विज्ञानाक्षीविहीना न सुजत सुमना नीचोच्चातीत सर्वा ।।
तेथें पैं प्राकृतांसी समसुर सरिसी जाति एकांसि नाहीं ।
तीन्ही ज्ञानें नियम्यें निजरचित कुहे मोहेहंकार हारी ।। २५०

आदी ना नाशु अंतीं निज युगविकृती चक्रवर्ती भ्रमातें ।
पात्रीले सर्वनाथें नियमित सुकृतें दृष्टिपातें निषेधी ॥
ऐसेयां अंतु नाही स्वनिजरुप कहीं ऊघडे नाम हातीं ।
भ्रांती जानासि मूळीं चिदपर कवळीं मैळी स्थूळी प्रभेदीं ।। २५१

भिन्नातें कोण जाणे सुखसहित खुणे नेणती ज्ञानि गोवा ।
वीगोत्रा जाण जाणा परपथशरणा साधना साम्य नीची ॥

कर्मा धर्मा प्रतीती निजरुपविकृती विग्रहीं मूर्ति लीळा ।
म्हणौनि ब्रह्मादिकूळा परतर सकळा भूलि शास्त्रार्णवासी ॥ २५२

शास्त्रें ज्ञानाभिधानें परवयुनहिनें चौरसी चाल नाहीं ।
देखौनी नेत्र नाहीं त्रिगुणकृत कहीं तेहिं गूणूनि गोवी ॥
देखा जूनेपणें पैं जणसमयगृहीं मुख्य वांचूनि नेणें ।
सामान्यें नेत्रशून्ये करिकरनयनें ज्ञान साम्याधिशेसीं ॥ २५३

तीन्ही जाती सुरेखा लघु शकति सुखामाजि साजीव देखा ।
निर्वीषा द्वीपदासी सुरसुरवर कसी चौहटीसि प्रसिद्धा ॥
दूजा एकीचि खूणा अतिचतुर दुणा साम्य ऊणा तिहींसी ।
तीजा कैसी विजाती द्विपदगतिरती मूर्त्ती मूर्त्ति प्रतिष्ठा ॥ २५४

वेदब्रह्मापरौता अतिनवलकथा सांघता चोजवेना ।
त्रिज्ञाना माप नाहीं बृहतर सुरही नेणती चक्रपाणी ॥
एरांचा कोण पाडू चिदवर अगडू केवढा चोजवेना ।
भिन्ना भिन्ना अभिन्ना परवचनहिना ब्रह्मादीं मोहपाशू ॥ २५५

नाना सिद्धांत भिंती न पवति सुयती निश्चिता पैं प्रतीती ।
विख्याती मार्गनाथी क्षपित निजरती प्राप्तिपात स्वरूपा ॥
अस्थूळें साधनें ही न पवतिचि काहीं चक्रपाणी प्रभूतें ।
जीवांतस्थें सुसाध्यें पतनचि विविधें बोधे मोक्षौनि जाणा ॥ २५६

सांडी शास्त्राभिमानू अति कवळित मनू गर्वविद्यामदें तूं ।
बूडाला कोण काढी भवतरु विघडी एकु चक्रेश्वरू पैं ॥
कृपाळू जीव जातां परवयनपथालागि धांडोळि सर्वें ।
आर्ती जिज्ञासु होई तमभरित रही पूस नागार्जुनातें ॥ २५७

श्रीमूर्तीतें स्विकरुनि जेथें चालतू चक्रपाणी ।
पापा धूनी करितु कवणी लीळावीलासभावीं ॥
जीवां ज्योती प्रकटितु पथीं सारथी ज्ञानियांचा ।
साचा वाचा परपथरुपा बोधि जीवस्वरुपें ॥ २५८

लीला केली विचरत जळी जे तळीं श्रीपदाब्जीं ।
तया द्वीजा भवभयगजामाजि वासूचि नाही ॥
जीवा जाणे स्वपति करणी निर्णिता जो प्रमाणी ।
सिद्धा हार्नी परतरधनी चक्रपाणीचि देता ॥ २५९

योगीविषें निजरतसुखें भूतळीं जीवजातां ।
सर्वां देता कवतिककथा आइका चक्रपाणी ॥
जे जे देता ठकतचि सुखें व्यावृत्ती आणवाये ।
वेधी राये नरसुरपशू स्थावरें जंगमेसीं ॥ २६०

देवां राजा विचरत अजा वेष विख्यात भूमी ।
जीवां स्वामी प्रकटत तमी सूर्य शंका विरामी ॥
नामी वेधू रजतमवधू कारकू शुद्ध बोधू ।
देता सिंधू परसुखमदू नाशकू गर्वियांचा ॥ २६१

नाना जाती विचिरतु एती श्रीपती वेधविद्या ।
जो सुवीद्या जड नर करी तो हरी अज्ञतेतें ॥
श्रूतावस्था प्रविशत पथामाजि आभासु दावी ।
जो गोसावी निजगतिरवी चेतवी ज्ञानियांतें ॥ २६२

काळातोंडीं नर सुर उडी घालितां कोण काढी ।
जो दूआडी जनचयसखा सारिखा देखिजेना ॥
आर्तीलागीं प्रकटित जगीं सर्वयोगेश्वरू जो ।
तो देवांतें करुनिवालिळा पाववी लोकलोकां ॥ २६३

जय परम पवित्रा सर्वदानैक चित्रा
विरचितपरसूत्रा सृष्टिभूतैकमित्रा ।
निजजनतमनाशा सस्वरूपप्रकाशा ।
विविधगतिविकासा सर्वभासा नतोस्मि ॥ २६४

शमदमयुतचिन्हा नित्ययुक्ताभिमानी ।
सुरवरफळदानी हानयोनी कटाक्षें ॥

विचरत वसुधेसी वेधराशी समस्तां ।
प्रकटित पशुजातां क्रूरता सांडवीतू ॥ २६५

अज तम पर कैसें जें असे साम्यरसें ।
भवंडित जन नाशे मृतिकाञ्चिन्निवेषें ॥
प्रहरुनि दृकपातें द्वैतदातेन पाठी ।
निज सकरुण दृष्टी पावती द्वीपदातें ॥ २६६

निरसित परवार्णा देवता स्वप्रमाणी ।
नव निशित पुराणी वेदवाणी विचारू ।
कारितुची अघनाशी तीरवासी द्विजासी ।
परतरगीत कैसी नागदेवासि दाता ॥ २६७

कैसा कटाक्ष बरवा झळके सुजीवां ।
प्रेमें वपू निज नवा परमात्मनाथू ॥
वाचामृतें निववितू पर चक्रपाणी ।
ताप त्रि नाशित गुणीं धरणी सुलीळां ॥ २६८

गोरेपणें झळकतां उणे आणितूसे ।
जांबूनदापासि कसे शतधा सुशोभे ॥
मूर्त्ती सुरेख सिख लावितु मन्मथासी ।
डोळां मनासि राहिवासु जनासि जाला ॥ २६९

चाले भले निजकळागति डोळसांतें ।
आकर्षितू वदन तें मिरवे प्रभूचें ॥
वक्षस्थळीं कुमुदकुंदसुगंधमाळा ।
भाळीं टिळा द्विजकला किळ फांकताहे ॥ २७०

शोभा म्हणो जर भली तर कोण सांघे ।
गेले ठकूनि अवघें पट चित्ररूपें ॥
तो चक्रपाणि जननी जनकू जनाचा ।
वाचा विचित्र तनु वाणिल कोण सृष्टी ॥ २७१

चक्रेश्वरा भवगजांकुश केलिलीळा ।
उच्चारितां मनमळां सकळां विनाशू ॥
जीवा म्हणौनि कथिका कथनीयमूर्ती ।
आर्ती स्मरै परपती निजदानि देता ॥ २७२

योगीशवेषा अतिशें सुरेखा ।
त्रिक्ष्या सुरक्षा करितां जनासी ॥
प्रकृष्ट इष्ट प्रकट प्रधान – ।
नागार्जुना दानिपती नतोस्मि ॥ २७३

जय जय जनिहारा कृष्णराया उदारा ।
जय जय बहुवेषा जीवदत्ता त्रिलक्षा ॥
जय जय वरदानी चक्रपाणी प्रभू जी ।
जय जय परमेशा त्राहि चक्रेश्वरा जी ॥ २७४

जीवा जाणै निरसित गुणी ताप तीन्ही जनाचे ।
साचे जे जे धरितिल दुजें सांडुनी श्रीपतीतें ॥
ते ते रोखे न मनित सुखें सर्वभावानुसारें ।
तो दातारें स्विकरित क्षणी चक्रपाणीचि पावे ॥ २७५

संसाराब्धीं विशाळीं तळमाळित जळीं ऊकळी जीव तापीं ।
नानारूपीं निढाळा ग्रसितवलिळा श्वापदीं क्रोधकामी ॥
तेथें लीळाप्रव्हाणी प्रभुपरचरणी वांचुनी नीगत्रेना ।
म्हणौनी लीळानुवादीं श्रुतसुभगसुधी वांचिजे चक्रपाणी ॥ २७६

चक्रेशा त्राहि मातें शुभ सुकृतपथें लागले राखसी तूं ।
तें नाहीं नीजनाथा सुर (स)कळपथा नातळे सर्वथा जी ॥
काम क्रोधांधकारीं रजतमकुहरी सप्तपाताळत्रेन्ही ।
गेला पैशून्यभारीं म्हणउनि श्रीकरीं काढि सर्वज्ञनाथा ॥ २७७

शरणदमदभेद द्वंद्व शुद्ध प्रबुद्धा ।
धममममतिविद्ध क्रोधरिद्धप्रसिद्धा ॥

अजगज निजबीजध्वांतविध्वांस्त सुस्त ।
सकरुण मृगराजा नात्र नेत्रे परेशा ।। २७८

ळिळा उच्चारि जीवा निजपति अथवा आइकै कर्णपूटीं ।
नाना गोष्टीसि मीठी करुनि करपुटी दास्य चक्रेश्वराचें ।।
ग्रामातें ळंघि ना तूं न चळताचि बहू आठवी चक्रपाणी ।
निर्वाणी क्षेमदाता मिळइळ त्वरिता स्वामि नागार्जूनाचा ।। २७९

इति गद्यें संपूर्ण समाप्त ।। छ ।।

कपाटे भास्कर कुमरा । जया नाव इती दामोदरा । तया लीखित गद्यटीका हस्ताक्षरा । वाचीता श्रोता वीजया ।। छ ।। शके १५९५

प्रमादी नाम संवत्छर । शुद्ध मार्गे खर नवमी तिथी निर्धारी । वार सानिवारु ग्राम आगरी । लीखित समाप्त ।। छ ।।

• • •

क्रमांक ०४५६९७ दि: ...२१०९
वर्ग ...२०७९ नों: दि: २२।३।७१

# सर्वसाधारण टीपा

१ षड्वर्गदुर्ग – षडांगवेद अथवा षड्दर्शनें यांस दुर्गम. पतीन – पती + ईन.

२ द्विजकुळव्रतरूप – द्विजकुळांत व्रत धारण करून राहिलेला. नास्तिविद्याप्रकोप– ज्याचें ठायीं विद्येचा प्रकोप नाहीं असा. सर्वशेष – सर्वांचा शेष म्हणजे ऊर्वरित असा परमेश्वर.

३ श्रुत – श्रुति – पाठ (अ).
पंचभेद – सहेतुक, अवलोकनरूप, तात्कालिक, अनियत, आश्चर्यरूप. तीन जाती – मनुष्यवेष, मायावेष, मायापुर.

४ वायुवेषातुर – वायुवेषा + आतुर. पूतना, शकटासुर व आवर्तासुर यांना कृष्णानें मारलें.

६ रंगनाथें – कृष्णानें. यशोदेनें कृष्णाला बांधण्याचा प्रयत्न केला व यमलार्जुन वृक्षरुपानें कृष्णाला मारण्यास आले असतां कृष्णानें त्यांचा नाश केला या गोष्टींचा उल्लेख श्लोकांत आहे.

७ बैसौनि – बसवून. तिसरी ओळ – दूध आगींत भस्म झालें असा अर्थ.

९ कागासुर, वत्सासुर, बकासुर व प्रलंब हे असुर कृष्णानें मारले.

१० कृष्णानें लीलेनें गोवर्धन पर्वत उचलला व इंद्राचा गर्व हरण केला.

११ काळा म्हणजे कालिया सर्प. कृष्ण त्याच्या फणेवर नाचला. हृदय–डोह असा टीप अर्थ देतात. हा ह्रद असा शब्द पाहिजे.

१२ गोकुळांत दोनदा आग लागली. कृष्णानें धेनुक, खर व व्योमासुर हे दैत्य मारले. व्योमरिष्टांतकु– व्योम + अरिष्ट + अंतकु.

१३ कृष्णानें अघासुर मारला तें वर्णन.

१४ ब्रह्मदेवानें वासरें चोरली तेव्हां कृष्णानें सर्व वासरांची रुपें घेतली.

१५ पूढाडवांगीं – पूढा + आडवा + अंगीं. न ठकत – टाके ना. न मरी – मरेना. चवथी ओळ – 'पुण्ये' असा पाठ (अ).

१६ नंद बुडाला असता त्याला वरुणानें नेलें व कृष्णानें जाऊन परत आणिला.

१७ अन्य देवता पुण्यानें परलोकीं स्थान देतात पण परलोक इथे आणून दाखवीत नाहीत. कृष्णानें इथेच वैकुंठ आणून दाखवले.

१९ वेणूच्या नादानें विश्व भरलें.

२० विंधा – विंधितो. भातार चोरी केली – नवऱ्याचे नकळत गेल्या. बैसुनी – बैसवून. गृहपतिनिरसे – नवऱ्यावर प्रीतिरहित. पांति कृष्णे – कृष्ण पाहातात.

२१ काममारें – कामभारें पाठ (अ). सधिमिरे–प्रदिमिरे असा पाठ शके १६०० च्या प्रतींत आहे.

२२ अक्रुरातें – अक्रुराबरोबर. कृष्णाच्या सवंगड्याकडे झाडांच्या फांद्या हाऱ्या.
२३ दनुजकुळकड्ड – दानववंशास वाईट असा. गजघटवरिठ·· अनेक हत्तींचा तुल्यबळ असा परीट.
२४ कुब्जार्चिला – मथुरेंत कुब्जेनें पूजिला (कृष्ण).
२६ स्वात्मप्रतीती–स्वात्माप्रतीती, पाठ (अ). मिति – मति पाठ (छ). स्त्रियांना मदन, वैऱ्याना काळ अशा नाना स्वरूपांत कृष्ण लेकांना दिसला
२७ सर्व मंडळी जणूंकाय कंसाच्या अंत्यविधीला आली होती. करें म्हणत – खुणा करून सांगे.
२८ घोट काढीन – प्राण घेईन. कागासुर, वासासुर, बकासुर, केशी इत्यादि दैत्यांचा उल्लेख आहे. पल्हावे – पहावे पाठ (अ). चाणूर व मुष्टिक – कंसाचे मल्ल.
३० दुसरी ओळ – मग – नव, पाठ (अ). सळ व सीफळ--मल्लाची नांवे.
३२ उग्रसेनाला मथुरा दिली, उद्धवाला प्रेम दिलें व राज्यव्यवस्था केली.
३३ दैत्य हे वनकंटक व यदु चंदनतरू अशी उपमा.
३५ नव्हती – पुरी पडत नाहींत. अस्ति व प्राप्ती–कंसस्त्रियांची नांवें.
३६ श्रिष्ठा – श्रेष्ठा, पाठ (अ).
३७ मागधाधियाकडे तेवीस अक्षोहिणी सैन्य होते.
३८ दिग्पाळी – दिग्पाळू पाठ (अ). शबदे – शब्दे. रुव्हारे – सवारे. पाठ (अ). दुसरी ओळ – इंद्रादिकांनी आपली नगरी टाकून भीतीनें गुहांत वस्ती केली.
३९ सहय – मुळांत सभय आहे. टीपेत ' सहय ' आहे व तें बरोबर दिसतें.
४१ बलरामपराक्रमवर्णन.
४२ वराहाच्या दाढेंतल्या पृथ्वीला, पर्वतांना तडे गेले. अनंत कोटी वज्रापेक्षाही जास्त तडाखे.
४४ दुसरी ओळ – धड क्षत्रीय नाहीस. दुसऱ्यांनी तुला पाळला.
४५ मम ग्रसित – मी ग्रासलेली.
४६ हाला – आला, पाठ (अ). सिहाणा मागधू.
४९ कृतांतासारखा प्राण्यांचा संहार करी.
५१ ५० व या श्लोकांत रणनदीवर्णन.
५२ निशित–निशित बाणी. कृष्णाने मागधाचे धनुष्य छेदले तेव्हां त्यानें रथाखाली उडी घेतली.
५३ जहाचे–जिहाचे पाठ (अ). मागध यादवसैन्याला व त्रिलोकालाहि आवरेना.
५४ पुढील कार्यहेतू लक्षांत घेऊन कृष्णानें मागधास सोडून दिले.
५६ कृष्णानें कुवलयपीड हा कंसाचा हत्ती, हत्ती, कंस, कागासुर, यमलार्जुन, अरिष्टासुर, केशि, धेनुकासुर मारले त्यांचा उल्लेख.

५७ कृष्ण मगधेश्वरास म्हणतो " ज्याला मुंगीलाहि विधवा करता येत नाही, तो यादवावर हल्ला करतो. ज्याच्या चालण्याने गवतहि मोडत नाही तो युद्ध कसलें करणार ? "

५९ जीवजा – मानवनिर्मित शास्त्र असा एक टीप अर्थ देते.

६० निःसत्वाना धीर देतो. तिसऱ्या ओळींत ' बळे ' शब्द जास्त आहे.

६३ / ६४ यवन – कालयवन. कृष्णानें मुचकुंदाकडून त्याचें भस्म करविलें. ' राजाधनी ' हा शब्द ' राजधानी ' असा पाहिजे.

६६ ' जाणउनि '– मुळांत ' जाणौनि '. प्रस्तुत पाठ अ प्रतीचा. एरे – मागधाने.

६७ मंत्र – मत्त पाठ (ग). मनी – मानी पाठ (क).

७२ पूतना, आवर्तासुर, कागासुर, धेनुक, केशी यांचे वधउल्लेख.

७३ यमलार्जुन, वत्सासुर, कालिया. शंखचूड व व्योमासुर यांचे मर्दन.

७४ मेली – मेलेला सांदीपनीचा पुत्र कृष्णानें गुरुदक्षिणा म्हणून परत आणून दिला

७६ शेवटली ओळ – तो हिला योग्य वर हे निश्चित.

७८ भाटा – भाटासह विवदता.

७९ कृष्ण मागधापुढे पळून गेला असें रुक्मीनें म्हणणे.

८० राजा – शिशुपाल राजा.

८१ दुसरी ओळ रुक्मीनें लगेच हो म्हटलें.
शेवटल्या दोन ओळी – प्रियतम आत्माभिराम हरीचें भाटाकडून वर्णन ऐकल्यावर त्याने कर्णद्वारजिव्हार भेदीत रुक्मिणीला वेधावस्था आणली.

८२ कुमरी – रुक्मिणी. आठ भाव – (१) स्तंभ (२) स्वेद – घाम (३) रोमांच (४) सगद्गदीत. (अधिकरित – अधिष्ठित). (५) कंप.

८२ (६) वैवर्णता (७) बाष्प (८) गात्रस्थितत्व.

८३ श्रुत – मी ऐकलें.

८६ दुसरी ओळ – तापत्रिकूटगिरी विदीर्ण करी असें वज्र.

८७ त्रय – काल, कुल, लोक.

८८ दासि – दास्य या अर्थी.

९० शेवटल्या दोन ओळी – आर्ता पाव.

९१ रुक्मिणीला इतका ताप झाला कीं हस्तदाहानें विडा दग्ध झाला. न जाऊन चालणार नाही असें श्रीकृष्ण म्हणाले.

९२ कृष्ण कोणास न कळवता गेला व त्याचें जाणें नंतर बलरामाला कळलें.

९६ सुदक्षिणादीसुते – सुदक्षणादि कन्यासंबंधी पुत्र पौत्रादिक.

९७ शेवटली ओळ – रुक्मिणीला अत्यानंद झाला असा आशय.

९९ न टके + अमितसाधनी.

१०२ खरी – करी पाठ (क)
१०४ भूतावळी 'घें', 'मारि' असे म्हणे. वाचिजे यादवा – यादवापासून वांचू.
१०५ घोटतील – यादव घोटतील.
१०६ पहिली ओळ – आम्ही येत नव्हतो पण तुमच्यामुळें युद्धांत फेकलें गेलो. मन उदो नाहीं – मनांत उत्साह नाही. शेवटची ओळ – आतां वांचलो तर परत कोणाच्यांत सामील होणार नाहीं.
१०८ पहिली ओळ – वाईट बुद्धीनें मारलो गेलो.
दुसरी ओळ – निघतांना कुलस्त्रियांनी मी जाऊ नये म्हणून निवारण केलें.
११२ वर्णन केलेल्या हत्यारांनी मारिलें.
११३ या श्लोकांतहि ज्या हत्यारांनी मारले त्यांचे उल्लेख.
शेवटली ओळ – यादवांच्या शस्त्रांनी बलवान् दैत्यानांदेखील झांपड आली.
११४ पथीं – रस्त्यांत चालतांना.
११६ दुसरी ओळ – आर्त होऊन रुक्मिणीनें रथापुढें स्वतःस घातलें.
११८ सांघे + अंबिकापुर.
११९ परिचारिकांतें – परिचारिकाबरोबर
१२० नतु – कृष्णापुढे नत होऊन.
१२२ प्रौढे + इंद्रनीलशिबिरीं. प्रौढे – पहुडे असा टीपा अर्थ देतात. हा शब्द 'पौढे' पाहिजे.
चवथी ओळ–राम - रम्य पाठ (ग)
१२३ दैत्यांकुश – कृष्ण. त्याचें आगमन आहे अशा त्या रात्रीं लक्षावधी कोटी शत्रूंचे समूह वाटोवाटीं वृष्णींच्या भयाने निद्रा उडून जागत होते व घोष करीत हत्तींच्या घरट्यांत रात्र घालविली.
१२९ तिसरी ओळ – वो अंबिके, नृपकुमरीं म्हणजे रुक्मीणीचा वर कृष्ण हो कां !
१३० कोडी + अनंता
१३१ चित वित – चित्त, वित्त.
१४० शेवटल्या दोन ओळी – शिशुपालासारखा प्रतिकाल विरुद्ध असतांना कृष्ण नवरी नेतो !
१४१ यादवांना झोडपणाऱ्या दैत्यांची नांवें.
१४३ मृष्टी – मृष्टीच्या ठायीं दैत्य यादवावर हल्ला करतात.
१४४ ध्या, धरा, मार दिल्यावर पळून जातील असे म्हणत.
१४५ न वच – जाऊ नकोस. रुक्मीणीला सोडलेस तर तुला जिवंत ठेवूं.
१४७ चतुर्ग्रय – चार प्रकारचें. जादज, स्वेदज, अंडज व उद्भिज.

१४९ दुसरी ओळ – तुला तेवीस अक्षोहिणीसह झोडण्यानें आम्हास तृप्ति झाली. विएळा – त्रियाळा, पाठ ( अ ). टीप वेळोवेळा असा अर्थ देते. 'बियाळा' असा शब्द असावा.

१५० मांगला – धूळ खाऊ नकोस असा एक टीप अर्थ करते.

१५२ शोरेभूतकृतांतजोत्रकुरुठा – शौर्यानें प्राणिमात्रांना कृतांतभूत झालेले जे राक्षस त्यांचें आश्रयस्थान.

१५३ गोसावी गुरू – शुक्राचार्य त्यांस बंदीत घातलें असें दुसऱ्या कोणी केलें नाहीं.

१५४ सवखंडीं – टीपेवरून कटारियासिइषुधी (कटारिया+असि+इषुधी) असा शब्द असावा असें दिसतें.

१५७ तिसरी ओळ – बळि, बळि म्हणत.

१५८ न लोटे – यादवांना लोटवेना. तुझे – तुझे यादव.

१६१ राने – मुळांत ' राणे ' आहे. ' राने ' अ प्रतीचा पाठ आहे. पोकळा परिवटीं – वस्त्र सांडून. शेवटली ओळ – धोंडे हे यादवांचे हत्ती भासूं लागले.

१६२ चुके – मरण चुके

१६६ रण हेंच लग्नस्थान अशी कल्पना या श्लोकांत आहे.

१७० वीराउर्षी – वीरायुद्धी, पाठ (अ).

१७२ वाटा पाटा, पाठ (छ).

१७४ पुष्पवर्षे – पुष्पवृष्टी, पाठ (ग).

१७८ शेवटली ओळ - रत्नकळसी द्वारकेंत प्रवेशत.

१८४ दुसरी ओळ – हा सुरपतिचा म्हणजे कृष्णाचा पहिला सोहळा.

१८५ शेवटली ओळ – स्त्रियांना लपविले तरी जिंकिले जाल हें त्रिवार सत्य.

१८६ विख्या – विक्षा, पाठ (अ).

१८७ जांब्रवतीपरिणयकथा – सत्राजित् यादवानें आपला भाऊ प्रसेन याला स्यमंतक मणि दिला. प्रसेनाला सिंहाने मारले व मणि नेला. सिंहाला जांबुवंताने मारले व मणि कन्येला दिला. कृष्णावर चोरीचा आळ आल्यानें त्याने जांबुवंताचा पराभव केला व जांब्रवंती मण्यासह आणली.

१८८ दुःकृतलिही – दुःकृतलि, पाठ (अ). पापराशीविनाशू–कृष्ण.

१८९ नग्नजीतीपरिणय – सात मस्त बैलाना वठणीवर आणावयाचे असा स्वयंवराचा पण होता. सपत–सप्त.

१९० मित्रविंदापरिणय– मित्रविंदेचे विंद व अनुविंद भाऊ. भग्नी–भगिनी. रत्नसू –वसुंधेचें विशेषण. अवंत्यै–अवंती नगरींत.

१९१ लक्ष्मणापरिणय–कढईतल्या तेलांत पाहून लक्ष्मभेदाचा पण. भूप – लक्ष्मणेचा पिता. त्याचें कौशल्य खोटें पडलें.

१९२ भद्रा व कालिंदी यांचा परिणय.

१९३ एका वेळीं अनेक रूपे धारण करून सहस्रावधी स्त्रियांच्याशी लग्न लावलें.

१९४ रतिकपटपथें—प्रद्युम्न हा मदनाचा अवतार व त्याच्या हातून शंबरासुराचा वध होणार असें भाविष्य होतें. म्हणून शंबरासुरानें त्याला उपजल्यावर पळवून समुद्रांत टाकलें. तेथें त्याला माशानें गिळिलें. तो मासा शंबराकडे गेला व त्यानें तो त्याचें घरीं मायावती नांवानें रति खयंपाकीण राहिली होती तिला तो दिला. तिनें तो चिरल्यावर बालक निघाले. नारदांनी हा मदन याची तिला जाणीव दिली व तिनें त्याला गपचुप वाढवलें. पुढें त्यानें शंबरासुरास मारलें.

१९५ —बाणासुराची कन्या उषा हिला स्वप्नांत प्रद्युम्नपुत्र अनिरुद्ध दिसला व ती त्याच्यावर अनुरक्त झाली. उषासखी चित्रलेखा हिनें निरनिराळी चित्रे काढून स्वप्नांत पाहिलेला अनिरुद्ध असें ठरवून त्याला गुप्तपणें उषेजवळ आणून ठवले. बाणाला ते कळल्यावर दोघांचें युद्ध होऊन बाणानें अनिरुद्धाला बांधून ठेवले. तेव्हां कृष्णानें श्रोणितपुरावर चाल करून अनिरुद्धाला सोडवले. नंतर बाणाचा पाठिराखा शंकर याच्याशीं युद्ध झाले इत्यादि कथा. बाणाचे ९९६ हात तोडले.

१९६ पौंड्रिक वासुदेवाने कृष्णाची नक्कल करण्याचा मान केला.

१९७ दुजे—दुसरे. पौंड्रिकमित्र काशिराजाचें.

१९८ काशिये—काशींत. सुदक्षिण—काशिराजपुत्र.

१९९ सांब—जांबवतीपुत्र. त्यानें दुर्योधनकन्येचे हरण केलें. तेव्हां दुर्योधनानें त्याला पकडून ठेवलें. बलराम सोडवण्यास गेले असतां त्यांची अवज्ञा केली. बलरामानें हस्तिनापूरच उलथण्याची वेळ आणली.

२०१ कृष्ण, भीम व अर्जुन ब्राह्मणवेषानें जरासंधाकडे जातात. तेव्हां आपण यांना पूर्वी पाहिलं आहे असें त्याला वाटतें.

२०३ सेल—शैल, पाठ (क).

२०५ दोन्ही—दोघे. भीमाला श्रम झाल्यानें अर्जुनाला खेद झाला हे पाहून.

२०६ हितात—हित+आप्त.

२०७ २०८०० राजे सोडवले.

२०८ अग्रपूजा कोणाची करावी असा धर्मराज विचार करू लागला.

२१० चैद्यराजा—चैद्यराजाचें.

२१४ धर्मयुद्धानें भागणार नाहीं म्हणून शाल्वादिक अदृश्य झालें.

२१६ तरूगिरिजसडा—पर्वतावरचें तरू त्यांचा म्हणजे त्यांच्या फुलांचा वगैरे सडा.

२१८ गांवी—द्वारकेंत. वीरा—यादववीरावर. वैनतेयासी—गरूडावरून.

२१९ अजू–कृष्ण. टाकी शोभें–उडून विमानाजवळ आला. गोसावी–कृष्ण. शाल्वाला खिळले.

२२३ शाल्वानें मायावी वसुदेव व देवकी आणली.

२२८ गुरुदक्षिणेप्रीत्यर्थ कृष्णानें त्याचा मृतपुत्र परत आणून दिला. ब्रह्मचर्याष्ट–अष्ट ब्रह्मचर्ये ज्याच्याठायीं असा कृष्ण.

२२९ एका ब्राह्मणाची मुलें मरत होती व त्यानें यादवांना शाप दिला. मुलांचे रक्षण करीन नाहीतर अग्निप्रवेश करीन अशी अर्जुनानें पैज घेतली. तरी दहावा पुत्र मेला. अर्जुनाच्या अग्निप्रवेशाचें निवारण करून कृष्ण क्षीराब्धीला गेला व मुलें परत आणली. लोकपाळ–नारायण.

२३० वायूचे दोन पुत्र भीम व हनुमान्. यांचें व नारदाचें गर्वहरण.

२३३ सहस्त्रार्जुनावर संतुष्ट होऊन त्याला सागरवलयांकित पृथ्वीचें राज्य दिलें.

२३४ मायांत्यजू– माया + अंत्यजू, मातंगवेषधारी.
तापत्रय – भौत, आधिभौतिक, स्व
आध्यात्मिक, दैवकृत, आधिदैविक

२३५ रेणुका–परशुराममाता. तिच्या अंत्यसमयीं दत्तात्रेय प्रभु आचार्य करावें असें तिचें वचन. जडचेतन--जड काष्ठाला कोंभ फुटतात असें दिसले कीं ते प्रभु ओळखावे ही खूण. अंत्यस्थिता स्त्री– जवळ असलेली माया.

२३८ दूजे–दुसरें वर्तन.

२३९ मंत्रजातापरोक्षें– मंत्रजाता + अपरोक्षें.

२४० दूजी–दुसऱ्याची. गोविंदप्रभुना श्रीचक्रपाणींनी सुपानें मारले व ज्ञान दिले. ( चक्रपाणीचरित्र ). तेबला – ते + अबला

२४० कामाख्या नांवाची स्त्री कामपीडित होऊन आली व श्रीचक्रपाणीसमोर धरणें धरून बसली. तिचें निवारण करून त्यांनी पुरत्याग केला.

२४१ त्रिभेदी–जड, अजड, चिज्जड आहेत जिच्या ठायीं.

२४२ गुंडमू–गोविंदप्रभू

२४५ गोविंदप्रभू परेशानी पाठीवर अवरशक्ती धारण केली होती. त्यांच्या दृष्टीनें जिवंत वेध संचार होतो. ते सांकेतिक भाषेंत पुटपुटत, ते पाहून श्रीचक्रधराना विस्मय वाटला.

२४६ मलकुलनृपबीज–विश्वादिमलप्रपंचकुलाचें आद्य बीज अशी अविद्या.
गोप्यभाषा–ज्याची गुप्तभाषा आहे असा.

२४७ लोकाधीशेशसेव्यावपु–लोकाधीश म्हणजे अष्टभैरव, त्यांचा स्वामी विश्वदेवता तिने सेवा करावी अशी जी माया तिचे शरीर म्हणजे शुद्धचैतन्य मूर्ती असा अर्थ एक टीप देते.

# पंथीय तत्वज्ञानविषयक टीपा

**श्लोक २४९**

" परमेश्वर हा एक आहे आणि देवता **गुणगुणी** म्हणजे रज, तम व सत्व या तीन गुणांना परस्पर गुणल्यानें जी संख्या येते तितक्या म्ह. नऊ स्थानीच्या आहेत. स्वरूपी (कार्य, कारण, स्वरुप व लक्षण), २ ब्रह्मांडीं (आन्नव, महान्नव, शाक्त आणि शांभव) ३ विभागीं (पिंडीं, ब्रह्मांडी, विग्रही व अवतारी), ४ निर्वचप्रकर्णी (अन्यथावृत्ती, युगधर्म, विद्यामार्ग आणि संहार) या **चतुसमर्था** ज्या प्रत्येकी चार प्रकारच्या खुणा **भाषर्णी** म्ह. श्रीमुखीच्या वचनांत सांगितल्या त्यावरूनही त्यांची ओळख पटते. **कोडींचेन्हीं** म्ह. कोटीमध्यें (मोजावयाचे) तर एक्यांशी आणि **मध्यें सुतत्वीं** म्ह. महान्नवाच्यामध्यें (वर २ पहा) जो शेषसख्या त्याची संख्या परिवारासहित एक लक्ष पंचवीस सहस्र आहे. **सप्तजाती** म्ह. सातव्या जातीचे जे अष्टभैरव आणि द्वय म्ह. विश्व व चैतन्य यांच्या विग्हित जी कृती, म्ह. देवतांनीच चेतन केलेली जी **जीवजाती** ती **ज्ञानप्रकाशी सुरसहित** म्ह. ज्ञानप्रकाशादी सर्व देवतासहित निपेधिली आहे. कारण **सुख सगुणपरी** म्ह त्रिगुणयुक्त देवतांचे जे सुख ते देखील त्यांच्याप्रमाणें त्रिगुणयुक्त आहे. **इति प्रकारीं शेखरीं** म्ह. अशा प्रकारच्या ज्या उच्च देवता त्या दासु कशीं जाणे त्या परमेश्वराच्या सेविका आहेत हें ब्रह्मविद्येचा कस लावून जाणावे "

श्लोकांत जीव, देवतांची व्यावृत्ती व परमेश्वरप्रतिष्ठा सांगितली आहे.

**श्लोक २५०**

" ब्रम्हांडांना गणती नाही. ही ब्रम्हांडें **नृप** म्ह. माया तिची कृती आहे, व **परहीं** म्ह. त्या कृतीचें आदिकारण ईश्वरप्रवृत्ती हेंच आहे, म्हणून सकळ देवता आपापली साधनें स्वतंत्रपणें उगाच निरूपीत नाहींत. विशिष्ट विज्ञानरूपी नेत्र नसल्यानें **मुमना नीचोचाचीत सर्वा** म्ह सुष्ट मनाची जी माया तिच्यासह सर्व नीच वा उच्च देवतांना यथार्थ ज्ञान **न सुजत** म्ह. सुचत नाहीं. **तेथें पैं प्राकृतांसी** म्ह. जेथें ते स्वत: देवतांना यथार्थज्ञान नाहीं, तेथें ते सामान्यांना कुठून असणार? **समसुर** म्ह. अविद्यावंत सर्व देवता समान असल्या तरी **सारिसी जाती एकासी नाहीं** म्ह. देवतांचे समूह परस्पर एकसारखे नाहीत. (कारण त्यांच्या भुजा, आयुधें, वस्त्रे इत्यादी गोष्टी भिन्न आहेत.) शिवाय **तीन्ही ज्ञानें नियम्यें** म्ह. स्वरूपीचे संपूर्ण ज्ञान, ब्रह्मांडी हाटवेचाचें[1] आणि विग्रही पिंडस्थेचे ही तिन्ही ज्ञानें; दुसरा अर्थ:– सकळ देवतांना परमेश्वराचें अस्तित्व, खालील

---

१ हाटवेचाचें ज्ञान– अल्पज्ञान. जसें बाजारांत जरूरीपुरतें आपण द्रव्य नेतो तसें.

देवतेस वरील देवतेचे अस्तित्व, आणि आपणापेक्षा खालील देवतेचे अपरोक्ष ही तीन ज्ञानें, तिसरा अर्थः– देवतेचें ज्ञान, फळियाचें[२] ज्ञान आणि साधनवंताचे ज्ञान. अशा प्रकारची तिन्ही ज्ञानें नेमलेली आहेत. त्यामुळें **निजराचित** म्ह. स्वकीय स्वरूपगत रचिलेल्या सर्व देवता, जिवास **कुहे** म्ह. कूपवत् कष्टप्रद झाल्या आहेत. त्यांच्या ठायीं मोह व अहंकार असल्यामुळें त्या **हारीं** एका हारांत किंवा एका ओळीत घातल्या सारख्या आहेत."

या श्लोकांत अनंत ब्रह्माडांतील देवतांची व्यावृत्ती केली आहे. (मुळांत 'नुपकृत' शब्द आहे. पण अ व इतर प्रतींत 'नृपकृत' पाठ आहे)

**श्लोक २५१**

माया मुख्य करून सकळ देवतांच्या विकारास आरंभ नाही व सर्व जीवांचा उद्धार झाल्यानंतर देखील त्यांच्या विकारांचा नाश होणार नाही. कारण **निजयुगविकृती** म्ह. त्यांची स्वरूपेंच मुळांत विकारयुक्त आहेत. त्याच विकारानें मायेनें जीवाला सकळ भ्रमाचा चक्रकर्ती त्याला पाववीले म्ह. चैतन्यास उपजविले. **सर्वनाथें नियमित** म्ह. सर्वांचा नाथ जो परमेश्वर त्याच्या नियंत्रणाधीन असलेली चैतन्यमाया **सुकृते दृष्टिपाते निमेषीं** म्ह. डोळ्याचे पातें लवत नाही तेवढ्यांत सृष्टिरचना संहार सहज करते अशा या रचनेला अंत नाहीं. पण **उघडे नाम हातीं** म्ह. हा ईश्वर माझा स्वामी आहे याची स्पष्ट जाणीव असून देखील **स्वनिजरुप कहीं** जीवेश्वराचे स्वरूप तिने कधीच पाहिले नाही कारण **चिद्पर कवळी** चैतन्यमायेनें सर्व देवता अज्ञानानें ग्रथित असल्यानें **भ्रांती जाणाली मूळीं** म्ह. पंचप्रकारयुक्त ज्ञान असलेल्या या देवतास्वरूपांना मुळातच जीव–ईश्वरविषयक अज्ञानमय भ्रांति आहे. म्हणून **मेळीं स्थूळीं प्रभेदीं** म्ह. आद्यमळा[३] पासून (चैतन्यमायेच्या मळापासून) यक्षिणीच्या मळापर्यंत स्थूळ सूक्ष्मादि भेदयुक्त अन्यथाज्ञानानें त्या व्यापलेल्या आहेत. " ॥ २५१ ॥

या श्लोकांत मायेनें जीवाला भ्रमविल्याचें वर्णन आहे.

**श्लोक २५२**

**भिन्नाते कोण जाणे** म्ह. सर्वव्यापक असून सर्वांतीत परमेश्वराला कोण जाणतो ? त्याच्याबद्दल देवतांना कल्पना असली तरी सुखसहित खुणे नेणती म्ह. आनंदादि अचिन्त्यानंदशक्ती व कार्य, कारण, स्वरूप, लक्षणादि खुणासहीत त्याला कोणीच जाणत नाही. म्हणून **ज्ञानगोवा** म्ह. स्वरूपगत ज्ञानाचा गोवा सर्वांस पडला आहे. याकरितां **परपथशरणा जाणजाणा विगोवा** म्ह. परमार्गी शरण रिगालेल्या

---

२ फळियाचें ज्ञान– देवतेचें फळ भोगणारा जीवात्मा त्याचें ज्ञान.

३ मळ– जीवाभोवतालचें सूक्ष्म प्रावरण.

जाणत्यांनी या व्यूहांतून सुटण्याचा मार्ग जाणावा. कारण **साधना साम्य** म्ह. ब्रह्मविद्या साधनाच्या समान इतर साधनें दिसली तरी ती **नीची** म्ह. कमी दर्जाची आहेत. कीं **निजरूप विकृती** म्ह. देवतांचें स्वतःचे स्वरूपच विकारमय असल्यामुळें (त्यांचें साधन विकाररहित कसें असणार ?) **कर्माधर्माप्रतीती** म्ह. बंधनकारक कर्मांच्या ठिकाणीं त्यांची बंधननाशक प्रतीती आहे. याचा अनुभव **विग्रहीं मूर्तिलीळा** म्ह. परशराम, भीष्माचार्यादिकांच्या उदाहरणानें विग्रह आणि ब्रम्हांडस्थांच्या (देवतांच्या) लीळेवरून प्रत्ययास येतो. म्हणून ब्रह्मादिकुळा म्ह. ब्रह्मदिकांपासून खालील सर्व देवतांना व **परतत्मकळा** म्ह. त्यांच्यापासून श्रेष्ठ चैतन्यमायेपर्यंत सकळ देवतांना आणि **शास्त्रर्णवासी** म्ह. सर्व शास्त्रांना भ्रांती पडली आहे.'' ॥ २५२ ॥

या श्लोकांत देवतांची अव्यक्तस्वरूपें व त्यांचें विग्रह आणि साध्यसाधन या सर्वांची व्यावृत्ती केली आहे.

श्लोक २५३

**शास्त्रें ज्ञानाभिधानें** म्ह. ज्ञानवाचक जितके देवता आणि शास्त्रें आहेत ते सर्व **परवयुनाहिने** म्ह. ईश्वरज्ञानरहित असल्यामुळें त्यांची **चौरसी चाल नाही.** म्ह. जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर या चौपदार्थांचा निर्णय करण्यांत गती नाही. ही शास्त्रें त्रिगुणात्मक देवताकृत असल्यानें **देखौनी नेत्र नाही**. म्ह. चारी पदार्थ विभक्त जाणून देखील त्यांचें कार्य, कारण, स्वरूप व लक्षण त्यांना पाहाता येत नाही. (कारण सगुण देवतांच्या त्रिगुणात्मक शास्त्रांना निर्गुण स्वरूप कसे कळणार ? ) ही शास्त्रेंही **गुणुनी** म्ह. गुणांना गुणांनी गुणून येणाऱ्या संख्येत अर्थात् नव प्रकारांनी मिश्र गुणांत गुरफटली आहेत. **देखा** जूनेंपणे पैं जण समयग्रहीं म्ह. पहा, अत्यंत प्राचीन अशा वेदादि षट्शास्त्रांच्या समूहगृहांत देखील **मुख्य वांचूनी नेणें** म्ह. मुख्य चैतन्यमायेशिवाय इतराची जाणीव नाहीं. मग सामान्य अशी इतर शास्त्रें तर नेत्रशून्यच असल्यानें वेदाइतकें देखील ज्ञान त्यांना कोठून असणार ? पण या सर्व शास्त्रांत ईश्वर, ब्रम्ह, माया इत्यादि शब्द येत असले तरी ते **करिकरनयनें** म्ह. हस्तरूपी नेत्रांनी हत्ती पाहाणाऱ्या अंधाप्रमाणें **ज्ञानसाम्याविशेसी** म्ह. देवता व ऋषिकृत ज्ञानाचें ईश्वरज्ञानाशी शाब्दिक साम्य दर्शवतात. सारांश ज्याला जी शक्ती प्रकाशते तो त्या शक्तीलाच अन्यथाज्ञानामुळें ईश्वरादि नांवानी संबोधतो '' ॥ २५३ ॥

या श्लोकांत ब्रम्हविद्येशिवाय इतर सर्व शास्त्रांची व्यावृत्ती केली आहे.

श्लोक २५४

**तीन्ही जाती सुरेखा** म्ह. ब्रह्म, माया व ईश्वर हे तिन्ही स्वस्वरुपीं सुंदर आहेत. पण माया ही अत्यंत लहान शक्ती आहे. **सुखामाजीं साजीव देखा** म्ह. सकळ जीवदेवतांच्या सुखामध्यें त्यांना जीववणारे जीवनरूप परमेश्वरसुखच आहे.

(त्यामुळें विश्वाची यथास्थिती कायम आहे). हें शास्त्रनिर्वचनानें पहावें. शिवाय **निर्वांषा** म्ह. विकाररूपी विषरहित द्विपदासी म्ह. सद्‌ब्रह्म आणि ईश्वराला तसेच **सुर** म्ह. मायेला **सुखर कशीं** म्ह. ब्रह्मविद्यारूपी उत्तम कसोटीला कसून पाहिलें असतां **चौहटीसी प्रसिद्धा** म्ह. कार्य, कारण, स्वरूप व लक्षण युक्त चौहाटी माया गुणवंती, धर्मवंती आणि विकारवंती आहे, हा निर्वच[४] प्रसिद्धच आहे. **दूजा** म्हणजे दुसरा जो सदब्रम्ह त्याची एकच खूण आहे कीं तो अतिचतुर आणि **दूना** साम्ययुक्त आहे म्ह. सद्‌ब्रम्हाचे परमेश्वराशी अतिशय साम्य आहे. तरी **ऊना तहींसी** म्ह. तो सकळ गुणरहित असल्यानें (जडाजडशक्तींचा आवाका त्याच्या ठिकाणी नाहीं म्हणून) तो परमेश्वरापेक्षां उणा आहे. **तीजा कैसी** म्ह. तो तिसरा परमेश्वर कसा आहे? **त्रिजाती** म्ह. सकळ जीवदेवतांपेक्षां तो त्रिजातीय म्हणजे भिन्न आहे आणि **द्विपद** म्ह ब्रम्ह व ईश्वराच्या पदी, **गति** म्ह. मोक्ष आणि **रति** म्ह. स्वानुभूती देऊन **मूर्तामूर्ति** प्रतिष्टा म्ह मायामूर्तिधारी तो म्ह. साधनदाता जीवांना अमूर्तिप्रतिष्ठा म्हणजे आपल्या निराकार स्वरूपीं पावन करतो." ॥ २५४ ॥

या श्लोकांत ब्रम्हविद्यानिरुपित त्र्यंश महावाक्यार्थ वर्णिला आहे.

श्लोक २५५

परमेश्वर श्रुतिरूप शब्दब्रम्हाच्या **परौता** म्ह. पलिकडचा असून त्याच्या अतिनवलकथा **सांघता चोजवेना**, वेदांनादेखील यथार्थपणें वर्णन करतां येत नाहीत. त्याच्या विज्ञानशक्तीसामर्थ्याची गणना करता येत नाही म्हणून त्या चक्रपाणीला श्रेष्ठ देवगण देखील जाणत नाहींत. **एरांचा कोण पाडू?** म्ह. तिथे इतरांना तो कसा जाणता येणार? **चिद्‌वर** म्ह. चैतन्यमायेच्या अलिकडे **अगडु** म्ह. चैतन्यदुर्गाचा खंदक अर्थात् अनंत ब्रम्हांडांचा विस्तार केवढा आहे हे **चोजवेना** म्ह. देवतांना जाणता येत नाहीं. (कारण एका ब्रम्हांडाच्या देवता दुसऱ्या ब्रम्हांडांत पाहू शकत नाहीत, तिथें अनंत ब्रम्हांडें व्यापणाऱ्या परमेश्वराला त्या कशा पाहणार?) **भिन्नाभिन्ना** म्ह. मायेपेक्षा सद्‌ब्रम्ह भिन्न आहे आणि सद्‌ब्रम्हापेक्षा ईश्वर भिन्न आहे तरी अभिन्न असा तो परमेश्वर आहे. परावाचायुक्त ईश्वरी ज्ञानरहित चैतन्यमायारूपी ब्रम्ह आदीकरून सकळ ब्रम्हांडांच्या देवतांना अज्ञानबंधरूपी पाश सदैव असतो. " ॥ २५५ ॥

या श्लोकांत पूर्णपरब्रम्ह ईश्वरमहिमा वर्णिला आहे.

श्लोक २५६

**निश्चिता पैं प्रतीती** म्ह. देवतांच्या ठिकाणीच त्यांची निश्चयात्मक ईश्वरप्रतीती असल्यानें देवतांच्या अनेक सिद्धांतांच्या भिंती ईश्वरप्राप्तीच्या आड आल्या

४ निर्वच— श्रीचक्रधरनिरूपित ब्रम्हविद्याशास्त्रार्थ.

आहेत म्हणून **सुयती** म्ह. उत्तम यतिजन **चक्रपाणीप्रभूते न पवती.** चक्रपाणी प्रभूची प्राप्ति करू शकत नाहीत. **विख्याती मार्गनाथी** म्ह. साधनमार्गाचा विख्यात नाथ. तो निजरतिक्षपित म्ह. स्वसुखाभिरती संपादन करतो. पण **प्राप्तिपातस्वरूपा** म्ह. सकळ फळे च्युतिमंत असल्यानें मार्गनाथाच्या स्वरूपाची प्राप्ती झाली तरी सुखफळावधी संपल्यानंतर त्याचें तेथून पतन होते. अंतर्यागादि अस्थूल साधनेदेखील चक्रपाणी प्रभूला जाणू शकत नाहीत. **जीवांतस्थे सुसाध्ये** म्ह. जीवाच्या अंतरीं संचरणाऱ्या साध्य सुखापासून देखील विविध ( शास्त्रांत आठ तऱ्हेचें पतन सांगितले आहे. ) प्रकारांचे पतन होते म्हणून ईश्वरबोधामुळें होणाऱ्या मोक्षाशिवाय सर्व देवतांची साध्यसाधनें नश्वर आहेत. हे जाणा ” ॥ २५६ ॥

या श्लोकांत नश्वर साधनांनी ईश्वरप्राप्ती होत नाही हे सांगितले आहे.

‘ प्राप्तीं पाव ’ असा मूळ पाठ आहे त्याऐवजी ‘ प्राप्तीपात ’ हा अनेक ठिकाणीं आढळणारा पाठ घेतला आहे. तसेच ‘ बाधे मोक्षौनि ’ ऐवजी अ प्रतीचा ‘ बोधे मोक्षौनि ’ हा पाठ घेतला आहे.

## सर्व साधारण टीपा

२५९ तळीं – भूतळीं. करण–कार्यकरण. हानी–प्रारब्धकर्महानी. परतरधनी–मोक्षतृप्ती.

२६२ आभास–श्रीमूर्तीचा आभास.

२६६ अज अशी अविद्या जडापासून चिज्जडापर्यंत सर्वत्र प्रवेश करते. पाठी–साधनाची पूर्णता झाल्यावर. द्वैतदाता–सद्ब्रम्ह व ईश्वर या दोहोचेही फळ देणारा.

२६७ तीक्ष्ण परवाणीनें देवतादिकांचे निरसन केलें.

२७८ मदभेद करणार. द्वंद्वशुद्ध–द्वंद्वातीत. प्रबुद्ध + अधम मम मति विद्ध. क्रोधाची ऋद्धी जेथें प्रकट होते. निजबीजअविद्या. अविद्यारूपी हत्तीला मृगराज असा परमेश्वर. नात्रनेत्रे–नेत्रांनी म्हणजे कृपाकटाक्षानी अविद्येचा छेद करणारा तुझ्या-वांचून दुसरा कोणी इथें नाही.

*

# शब्दकोश

अगड–खंदक
अटवी–अरण्य
अटाटा–श्रम, बोभाटा
अडदर–भय, धाक
अतिसोटा–अतिभयंकर
अदट–धीट, पराक्रमी
अधमति–हीनबुद्धी
अनळ–अग्नी
अनंग–काम
अमृत–दूध
अरबट–आडदांड
अरुहण–पूजासामुग्री (टीप). आरोहण?
अवर–अलिकडचा, धाकटा
अवलीला–लीलेनें, सहज
अवेव–अवयव
अश्वथाट–घोडेस्वार
असिक–समग्र, सर्व
असुध–रक्त
अस्थूल–सूक्ष्म
अंतौर–स्त्री
अंत्र–आतडें
आंकण–ब्रीद, भूषण, अंकित
आघवे–सर्व
आटी–खटपट, मिठी
आटोप–पसारा, क्षोभ
आड घाली–आडवा पडे
आडमोड–मोडतोड
आण वाये–शपथ घेतो
आततज्ञ–विस्तारीत ज्याचे ज्ञान आहे.
आतळणे–पावणे, सामील होणे
आति ना–मिळत नाही
आतुर–व्यथित, पीडीत
आत्राटणें–ताडण करणें
आभूळ–मेघ
आमुला–ढादुला
आयस्–लोखंड
आरणी–युद्धभूमी
आरव–नाद
आरोहण–वाहन
आलोचित–विचारपूर्वक
आवर्त–भोवरा
आस्य–मुख
आहक–एक यादव. ( टीपा उग्रसेन असा अर्थ देतात.)
आहती–मारानें
आहव–रण
आहाळणें–भाजणे, मारणें
इटा–भाल्यासारखें शस्त्र
इषुधी–भाता
ईन–प्रकाशिता (सं. ई–प्रकाशणें )
रुक्मी–रुक्मिणीचा भाऊ
उखरडे–सैन्य
उजू–समोर, सरळ
उतटणें–उकलणें
उत्संग–मांडी
उदान–एक वायू, मृत्यूसमयीचा श्वास
उपचय–समूह, गुच्छ
उपवडणें–जागृत होणें
उभय लोक–परलोक व अपरलोक
उरग–सर्प
उल्हाटणें–उलथून पडणें
उशनसी–शुक्रकृत राजनीतीग्रंथमार्गी-(टीप).
ऊका–उल्का, ज्वाला
एतूला–इतका
ओखटें–वाईट
ओघ–प्रवाह

ओज–व्यवस्था
ओडवणें–वेणें, पुढे करणें
ओदन–भात, जेवण
अंगन्यासी–वेदमंत्रादिकरून (टीप)
अंघ्रि–पाय
कटक–सैन्य
कटा–कट्टा, भयंकर
कथिक–सांगणारा, पुराणिक
कदन–संहार
कर–किरण, हात, सोंड
करी–हत्ती
कवतुळ–कौतुक
कवळ-घांस
कवळणें-पकडणें, व्यापणें
कहीं–केव्हां, कधीं
कांड–बाण
काती–एक हत्यार
कापखंडी–अर्धचंद्राकृती बाण (टीप)
काम–मदन, प्रद्युम्न
कामपाळ–बळरामाचे विशेषण (४८)
कामाख्या–कामरूप आहे आख्या ज्याची
कामादिकीं–कामादिकीकृत ग्रंथमार्गी (टीप)
कार्ष्ण–कृष्णाचें, काळें
कासणें–बांधणें, काचणें
कासोळी–एक वाद्य
काहाळ–नगारा
किंकर–दास
किराण–नेम, मारणें
किला–प्रभा
कुक्कुर–एक यादवकुळ
कुच–स्तन
कुजाती–वाईट जातीचा
कुट–चूर्ण
कुडे–कपट, खोटें, खिन्न
कुरूठा–शहाणा, आश्रय
कुरुवीर–पांडव
कुहक–कपट, लाघव
कुहर–गुहा, आगर
कुवलयपीड–कंसाचा हत्ती
केलि–क्रीडा
केसु–केसक, किंशुक, पलशपुष्प (नरेंद्र, रु. स्वं. ८४५)
कोदंड–धनुष्य
कोल–एक हत्यार
कौंती–एक–हत्यार
कौमोदकी–कृष्णाची गदा
क्रतु–यज्ञ
क्रतुपति–राजसूय यज्ञ
खग–पक्षी
खंदळणें–रगडणें
खर–गाढव
खरासिंग–एक वाद्य
खळ–आंगण, उघडी जागा
खांखाति–खा खा करतात.
खांचणें–खंडण करणें
खांड–भाग, चीर, टोळी
खीखीयाट–एक परीट
खिरडणें–जिंकणें
खेंव–मिठी
गडी–गडावर (२१२)
गवसणें, गिवसणें–शोध करणें
गाजना–गर्जना
गाळी–शिव्या
गाळले–पिळून काढले (५५)
गिरीश–महादेव
गुड–रास
गुडगडी–गडगड करीत (टीप)

गूढर–अंबारी, जाजम
गूढि–निशाण
गोमती–नदीचे नांव
गोवा–गुंत, बंधन
घडघाडित–घडघड बोलला (३६)
घनवट–भरदार
घसे–घसा, नरडें
घंगाळ–एक भांडे, गोंगाट
घारणें–बांधणें
घालु–हल्ला, चढाई, (टीप)
घेरी–डफासारखें वाद्य
चक्रवाट–रथाच्या चाकाची वाट
चडकण–चापट
चतुर्ध–चतुर्विध
चवकणें–दचकणें
चांग–चांगलें
चांगावें–चांगलें, उत्तमत्व
चाल–गती, चालक (६१)
चित्तकानी–चित्तीं व कानीं (२२१)
चिंतावस्तुपरिवृतु–चिंता अवस्थेनें व्यापलेला
चित्रक–नाना तऱ्हेचे
चेतन–चैतन्ययुक्त
चोजवणें–जाणणें, कौतुक करणें
चौतोंडा–चार तोंडाचा, ब्रह्मदेव
चौरस–चार प्रकारचे—
दृक्, आलाप, स्पर्श, अंतःकरण
अथवा
प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द
यासंबंधी, असे अनेक अर्थ आहेत.
चौहट–चवाठा
जनिहार–संसारहारक
जंबीर–लिंबाची जात
जमू–यम
जयविजय–विष्णूचे द्वारपाल
जवळिपासी–जवळपास
जहाचे–जेहाचे, जयाचे
जांघवा–जांघा
जात्यश्व–जातिवंत अश्व
जांबूनद–सोने
जिणणें–जिंकणें
जोहारणें–वंदन करणें
झड–लगट, हल्ला
झल्लर–झालर
झष–मासा
झांजरणें–छिन्न करणें
टकणें–मिळणें, येणें
टका–निशाण, अग्रभाग
टंकार–टणत्कार
टांग–शीर
टाटावणें–करकचून बांधणें
ठक–टक, भूल
ठकणे–तटस्थ होणें
ठाता–उभे राहता
ठीक–जडाव, जडावाचा दागिना
ठीकला–रत्नजडित
डाउ–लग्नातला सुपारीचा खेळ
डांगा–फांदी
डांगोरा–हाकाटी
ढाळ–पाणी, तेज
ढिसाळ–प्रचंड
तटे–तडे (४२)
तडक–तडाका, नेट
तण–तृण, गवत
तवक–आवेश, त्वेष
तळ–खाली
तांबकी–टिमकीसारखे वाद्य

तांबा–तांबडा
ताम्राक्षी–रक्तनेत्र
तालिका–टाळी
तावणे–तापवणे, ताणणें
तूडी–युद्धकर्मात उतावळा (टीप)
तुमुळ–तुंबळ, भयकर
तुर–एक वाद्य
तुगेल–एका तऱ्हेचा तिनधारी बाण (टीप)
त्रिकूट–गुणत्रय, अथवा मतित्रय
त्रिवाचा–परा, पश्यंती, मध्यमा
त्रिशुद्धी–त्रिवार, खरोखर
थडक–आघात, धक्का
थिरु–स्थिर, थांब
थोकणें–थांबवणें, स्थिरावणें
थोबडे–तोकडे, कमी प्रतीचे, असुंदर (शिशुपाल वध ४०७)
दडा–समूह
दमघोष–रुक्मिणीपिता
दरकुट–दरी
दवडिला–सोडून दिला
दवंडी–ढोलके, डांगोरा
दाड–द्वाड, वाईट
दापाती–जरब बसवणारी
दापुगे–दांडगे
दामोदर–दोरांनी बांधले उदर ज्याचे असा कृष्ण
दारुक–कृष्णाचा सारथी
दासिरु–दास, दूत
दिघाळे–बरचीसारखे हत्यार
द्विज–दांत, ब्राह्मण
द्वियवर्ग–इंद्रादिक वर्ग (३६)
दी–दिवस
दुणा–द्विगुणीत
दुलाकुड–वाईट लाकूड
दुआड, दुवाड–द्वाड, दुर्घट
दुष्टदर्पघ्न–दुष्टांचा दर्प हरण करणारा (कृष्ण)
दूतोंडी–दुधारी हत्यार
देवमारी–गदेचें नांव
धरी–शस्त्रविशेष (टीप)
धवधनी–पूर्ण तृप्ती
धाकड–धीट, धैर्यवान्
धाटी–हल्ला, तऱ्हा, रीत
धाटी सुए–वठणीवर आणतो
धांधा–धंदा, व्यवहार (ज्ञानेश्वरी १५।३१४) टीपा ध म्हणजे शब्द, अथवा वेद तेणें अंध असा अर्थ देतात.
धापसणे–धापा टाकणें
धूनीत–हालवीत
धुंधुकणे–फेकणें, टाकणें
धूपायन–धुपाटणे
ध्वांत–अंधार
नटु धरुनि–अभिनय करून
नंदक–कृष्णाचे खड्ग
न पाय–न पाहे
नभगती–नभमार्गे
नय्यसि–न एसि
नवगुणशतलक्ष–८१ कोटी (९×९)
नवनाथ–नऊ स्थानांच्या देवता त्यांचा नाथ परमेश्वर
नागरें–नांगरानें (१९९)
नागारी–भाट, बंदिजन
नागार्जुन–नागदेवाचार्य
नानाते–दुसरे नाहीत असे
नाविक–क्षणभर
निकर–समूह, आवेश, हट्ट

निकें–चांगले
निच–नित्य
निडें–जवळ
निढाळ–निस्तेज
निनणें–नेणें
निबर–प्रखर, तीव्र
निःप्रपंच–संसारातील
निभ्रांत–निश्चित
नियमी–नेमी
नियम्य–नियमीत
निराणी–आनंदकारक (टीप)
निराश–आशारहित
निरुती–निश्चयें
निरुढी–लोकाचार, युक्ती (निरवड)
निर्वाळा–निश्चय
निवटणें–तोडणें
निशाण–रणभेरी, नगारा
निशित–तीक्ष्ण
निशीथ–रात्र
निसुग–कोडगा, निर्लज्ज
निहटणें–बळकट धरणें
निहटी–जवळ
निहार–टक लावून पाहाणें
निहुल–मंद, निश्चल
नीडळ–कपाळ
नीर–पाणी
नीलज्ज–निर्लज्ज
नुपूर–पैंजण
नेणणें–न जाणणें
नोकणें–छळणें, कृपादृष्टीनें पाहणें
पंचानन–सिंह
पटका–मोठा नाश, गळती
पट्टिशाला–पाठशाला, राजमठ
पडवळ–एक भाला
पत्रवल्ली–वेलबुट्टी
पदाती–पायदळ
पर–सर्वोत्तम, श्रेष्ठ
परिकर–सुंदर
परिघ–गदेसारखें लोखंडी हत्यार
परियसणें–ऐकणें
परिवट–वस्त्र या अर्थी (वट–तंतू)
परिवर–घर, माजघर
पऱ्हात–प्रल्हाद
पल्हावे–पहावे
पळिपणें–जळणें
पक्षिणी–पक्षांत
पाउडा–परावृत्त
पांजरा–पिंजरा, सांगाडा
पाटा–दगड, शिळा
पांति–पाहातात
पायदा–पायदळ
पायाळ– ,,
पायांचा–पायदळाचा
पारके–शत्रू
पारणे–तृप्ती
पावक–अग्नी
पाळेगण–समूह
पांशु–धुळ, केर
पीटिका–पीठिका, राजधानी
पीढ–पीठ, आसन
पिंड–देह
पिशित–मांस
पीयुष–अमृत
पुरचर–नगरांत फिरणारे, नागरिक
पेरोज–एक रत्न, वैदूर्य
पैशुन्य–दुराचरण, दुष्टता

पोफसे पाडी–दचक भरवी (टीप)
पोवणें–ओवणें, पोहणें
प्रकृष्ट–अति उत्तम
प्रचुर–पुष्कळ, विस्तारित
प्रणणें, पर्णणें–विवाह करणें
प्रती–नक्कल
प्रभुपुरी–द्वारका
प्रलंब–कंसाचा एक असुर
प्रव्हाण–होडी (प्रवाहण)
फुडे–खरोखर
फोकरणें–पुकारणें
बगोटे–मानगुट
बरवत बरळत, बोलत (टीप)
बळ बळवान्, बळिराम
बलि–बलवान्
बाऱ्हाट–कंदन (टीप)
बांदौडि–बंदिखाना
बाळघ्न–बाळ मारणारी
बिजे–गमन, येणें
बिदी–रस्ता
बियाळ–बेंबळ, निसत्व
बीक–सामर्थ्य, आवड
बीटी–एक प्रकारचे बाण (वर्तुळाकार
बोबडी–डफडी
भंगाणले–भंग पावले
भट–वीर
भडाडू–अग्नीचा भडका
भद्र–सभागृह, दिवाणखाना
भद्रजाति–उत्तम प्रकारचे हत्ती
भरत–नाट्य–संगीतशास्त्रप्रणेता मुनी
भार–सैन्य
भिडभीत–भिडेने चेपलेला
भीड–गर्दी
भृशुंडी–एक हत्यार
भे–भय
भेद–प्रकार
भेरि–एक वाद्य
भेलक–एका प्रकारचा बाण (चौधारी)
भेलकी–गुळाची ढेप
भोजराज–कंस
मडेमिषें–मेल्याचे सोंग करून
मडौरा–एक वाद्य
मतिरही–मतिहीन
मंत्रपुत्र–मंत्रोत्पन्न पुत्र
मदालसातनय–अलर्क राजा
मरगज–पाच
महिसे–म्हसोबा
महादेव–शंकर, एक तीर्थ
महापड–महापट, ध्वज
माणकुली–लहान माणिक
मातुलांग–महाळुंग
मार–मदन
मारक–मारणारा
माल–मल्ल
माल्हाथणें–आश्रय करणें
मिठी देणे–संहार करणें, गिळणें
मिती–परिमाण
मुक्ताफळ–मोती
मुगवित–मुक्त करीत (टीप)
मुगुत–मुकुट
मुंजाटवी–मुंजा असलेलें अरण्य
मुळवणी–मुळावर आलेली
मूहाडी–मुख, मस्तक (टीप)
मूळ धाडणें–बोलावणें, आमंत्रण करणें
मेखला–कमरपट्टा
मेघल–मेघासारखें

मेळा–समुदाय
मोहर–अग्रभाग
यम–काळ, भयंकर व्यक्ती
यमसुत–धर्मराज
यवन, युवन–कालयवन
याम–प्रहर
योषिता–स्त्री
रंग–रंगण
रजनी–खराटा, रात्र
रणउनि–रणांतून
रत्नसू–रत्न प्रसवणारी
रव–ध्वनी
रवस–जोर
रहिवास आला–वेध लागला
राउताली–दल, सैन्य, घोडेस्वार
राउतै–क्षात्रवृत्ती
राजपिढी–राजधानी
राम–बलराम
रिगणें–शिरणें
रुठणें–मारणें, रुसणें (टीप)
रूपडें–सुंदर रूप
रेव–रेती
रेवणें–भरणें, रचणें
लट–गुंतागुत, झोटी
लहुडी–लोखंडाचे टोंक असलेली काठी, एक हत्यार
लक्षवारी–लक्षावधी
लाठा–धीट, निर्लज्ज
लाठी–बलवान्
लानी–अलंकार, सीमा
लांबा–लांबलचक
लि–लिखित
लेख–गणना
वडवडी–वाडोवाडी

वत्सर–वर्ष
वनवणें–करपणें, जळणें
वमणें–ओकणें
वयुन–ज्ञान
वर–योग्य, ठीक
वरदा–एक नदी
वसैठा–स्थान
वहिला–प्रथम
वळगणें–चढणें, पोंचणें
वाइणें--चढवणें, वाहणें
वाघवडा–मेघडंबरादिक सिहाडे ? (टीप)
वाजट–वाचाळ, वाद करणारा
वाणें–वाजवणें, वाहणें
वाताशा–वात सेवन करणारा, सर्प, शेष
वायट–वायुसंचार झालेला
वारि–घोडा
वार्ताकर–दूत, जासुद
वार्तिक– ,, ,,
वासिपणें–भिणें
वासु मांडी–स्थान मांडी
विकट–भयानक
वेंझ–वेंग, मिठी
विख्या, विक्षा–अवलोकन, ब्रह्मविद्या (टीप)
विगुण–निर्गुण
विघडणें–नाश करणें, वियोग करणें
विघडू–नाशक
विटक–विडा
विटंक–निबिड, अवाढव्य
वितान–मंडप, छत
विदगद–विदग्ध, कुशल
विद्रुम–पोवळें
वीघी–वीथी, रस्त्यांत
विंदान–चातुर्य, कौशल्य, कपट

विंदानीताती– कौशल्य दाखवतात
विपरिततिथिकारी–अमावास्या करणारा
(जयद्रथ वधप्रसंगी)
विपायें–कदाचित्, दैववशात्
विमासर–विशेष मत्सरी, मत्सरहीन
विलक्ष-विशेष लक्ष
विशसणे–नाश करणे
विशाणणे } –चिडणें, आवेशयुक्त होणे
विसणणे }
विषाग्नी–विषाची आग
विसर्ग–फेकणें, मार्गांनी उत्पन्न केलेले शास्त्र
विहीन–क्षुद्र
वीरमुद्रा–पायाच्या मधल्या बोटांत
घालण्याची अंगठी
वुमथला–उमटला
वृंद–सभा, समाज
वृष–बैल
वेध–ठाव घेणें, विद्या (टीप)
वेल्हावणे–आनंदणें
वैदूर–शाहाणें, नीतिशास्त्रज्ञ (विदुर)
वैनतासूत–गरूड
वैरिखिद–वैऱ्याना खेद आणणारा
वैवस्वत–यम
वोडण–ढाल
वोडणगिरी–पर्वतासारख्या ढाली
वोहर–वधूवर
व्यंकट–वक्र
व्यसु–गतप्राण (वि+असु)
व्यावर्तन–निराकरण
व्यावृती–भिन्नता, निरास
व्यासपुत्र–शुक
व्याळ–सर्प
व्रतधर–व्रतधारी, अवधूत

शकट–गाडा
शकती–शक्ती
शरणद–शरणावर दया करणारा
शिस–शीर
शोभ–शाल्वाचे विमान
शोभा–एक दुर्ग
शौरी–कृष्ण, क्वचित बलराम
श्रिमाट–गर्व, अहंकार
श्रिष्टा–सृष्टा, निर्माता
श्रीमंतक–स्यमंतक
सइरा–सैरा
सकट–समग्र, शकटवंशी
सकंदी–मुळासकट
सख–सखा
सधिमिरे–दग्ध, दोन तुकडे झालेले
(टीप) सतिमिरे ?
संधि–समय, सांधा
समय–संकेत, वेळ
संबोखणे–समजूत करणें
सर्वभासा–सर्वप्रकाशका
सर्वयुगता–सर्व युक्तता
सविया–सहज
सहजनी–जनासह
सहदेव–जरासंधपुत्र, पांडवापैकी एक
सहस्रशीर्ष–शेष
सळ–अभिमान, छळ
सळणे–छळणे
सांगडा–सारखा
सांटणें–भेदणें
सांधणी–शिकवण, घाटणी
सात्वी–सत्वयुक्त
साननी–तोंडानें, नाद करून
सांपे–सांप्रत

साबळे—भाल्यासारखे हत्यार
साम्यरसें—समरसपणें
सारी—बाजू हो
सारिखा—योग्य, सारखा
सिंथणें—मारणें, फेकणें
सिहाणा - शहाणा
सीक—शिक्षा
सुझणें—समजणें, दिसणें
सुताळा—तालयुक्त
सुभट—भव्य, चांगलें
सुरवे—मोठा आवाज करणारे
सुरसेवित—सुराधिष्ठित
सुहावी—सुंदर
सूंक—सुख (शि. त्र. ४७)
सूदणें—मारणें, घालणें
सूनि—ठेवून, रिकामी
सुनीती—राजनीतीसंबंधी
सूर्प—सूप
सूलगडे— मुद्गल (एका टिपेप्रमाणें)
सूळ—शूळ, भाल्यासारखें हत्यार
सेल—खाण्याचा पदार्थ, टोंक, (शैल)
सेलणें—टोंचणें
सोटा—आडदांड
सौध—मोठा वाडा, अमृततुल्य (सुधा.)
सौनंद—बळरामाचें मुसळ
स्तबक—गुच्छ
स्व—आपण स्वतः
स्वभावें—सहजगत्या
स्वेच्छावसें—स्वच्छंदानें
हरु—शंकर, हरण
हस्तशाखा—हाताची बोटें
हाकरणें—हाक मारणें
हातपीटी—हातघाईची मारामार
हातियेर—हत्यार
हाथी—हत्ती, क्वचित् हात
हाला—हाणला (ज्ञा. ११।१०५)
हिंपुट—कष्टी, खिन्न
हिय—हृदय
हिंसळ—हिंसक
होक्य—होणारे, भविष्य
होड—पैज
क्षपण—फेकणें
क्षीराब्धिजात—चंद्र, चंद्रवंशी यादव (२२८)
क्षीरोद—शुभ्र
क्षुद्र—लहान
क्षेत्री—क्षत्रिय

—:o:—

REFBK-0015579

REFBK-0015579

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९५५८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
नमुक्रम. ९५५८९ दि. [illegible]
[illegible] [illegible] नों दि. [illegible]

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचीं प्रकाशनें

| | | | |
|---|---|---|---|
| १ यादवकालीन महाराष्ट्र | –डॉ. मु. ग. पानसे | रु. | १२–०० |
| २ प्राचीन मराठी कविता (भाग १ ला) | –संपा. ज. शा. देशपांडे | रु. | ३–०० |
| ३ ,, ,, (भाग २ रा) | | रु. | ४–०० |
| ४ महाराष्ट्रीय संत : वाङ्मय व जीवन | | रु. | ४–०० |
| ५ बालसाहित्याची रूपरेखा | –सौ. मालतीबाई दांडेकर | रु. | १२–०० |
| ६ साहित्यांतील आग्रह व दुराग्रह | –वि. वा. शिरवाडकर | रु. | ०–५० |
| ७ लोकसाहित्याची रूपरेखा | –श्रीमती दुर्गाबाई भागवत | रु. | १०–०० |
| ८ दर्पणसंग्रह | –संपा. जोशी व सहस्त्रबुद्धे | रु. | ३–०० |
| ९ मराठी दोलामुद्रितें (सुधारलेली आवृत्ती) | –संपा. प्रा सु. आ. गावसकर | रु. | ५–०० |
| १० भाव वंदना | –संपा. चित्तरंजन कोल्हटकर | रु. | १–५० |
| ११ सुलभ नाट्यशिक्षण | –डॉ. न. अ. बरवे | रु. | ५–०० |
| १२ ग्रंथालय गौरव ग्रंथ: (भाग १ ला) | –(लेखसंग्रह) | रु. | ३–०० |
| १३ टारफुला (कादंबरी) | शंकर पाटील | रु | १०–०० |

## इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला

| | | | |
|---|---|---|---|
| १ पानीपतचा संग्राम | –सेतुमाधवराव पगडी व प्रा. न. र. फाटक | रु. | ५–०० |
| २ घाशीराम कोतवाल | –संपा. प्रा. न. र. फाटक | रु. | ४–०० |
| ३ मुंबईचें वर्णन | –संपा प्रा. न. र. फाटक | रु. | ८–०० |
| ४ मराठे व निजाम | –सेतुमाधवराव पगडी | रु. | ७–५० |
| ५ गड–कोट–दुर्ग व त्यांची वास्तु | –वा. सी. बेंद्रे | रु. | ३–०० |
| ६ इतिहास संशोधन पद्धति | –के. मो. पंडित | रु | ०–७५ |
| ७ रट्टवंशीय वल्लाळ याचा अर्धापूर शिलालेख | –संपा. पोहनेरकर व टोसर | रु. | २–०० |
| ८ राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज | –वा. सी. बेंद्रे | रु. | ६ ०० |
| ९ निबंध संग्रह (महाराष्ट्रेतिहास परिषद) | –सं. वा. सी. बेंद्रे | रु. | ८–०० |

: एकमेव विक्रेते :

### साहित्य सहकार संघ लिमिटेड

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२ नायगांव क्रॉस रोड, दादर, मुंबई क्र १४.

नवे नवनीत —

अद्यावत् प्राचीन व अर्वाचीन कवितांचा संग्रह
पूज्य विनोबांची प्रस्तावना किंमत रु. १०

**प्राचीन मराठी कविता —**

खंड १ ला– विठ्ठल कळपूरकर कृत रासक्रीडा
विश्वनाथांचे ब्रह्मांडपुराण,
नामा पाठकांची चंद्रहास कथा,
चोंभाच्या उषाहरणाची पाने इ.— किंमत रु. ३

**प्राचीन मराठी कविता —**

खंड २ रा– नामा पाठकांची स्फुट कविता किंमत रु. ४

**प्राचीन मराठी कविता —**

खंड ३ रा– कृष्णदासांची बाळक्रीडा व
विष्णुदास नाम्याची चक्रव्यूह
कथा (द्रोणपर्व) किंमत रु. २

**प्राचीन मराठी कविता —**

खंड ४ था– हयग्रीवाचार्यांचे गद्यराजस्तोत्र किंमत रु. २

## आगामी प्रकाशने

**प्राचीन मराठी कविता —**

खंड ५ वा– नामदेवांची स्फुट आख्यानें

**प्राचीन मराठी कविता —**

खंड ६ वा– नृसिंहाचें रुक्मिणी स्वयंवर

**सुबोध गीता —**

गीतेचे सोपे भाषांतर व विवेचन

**आनंदांची कविता —**

कै. वि. ल. बर्वे यांच्या निवडक कविता

• • •